आंदोलन

· वर्ष 13 । अंक 08 । मूल्य 20/- ·

शाश्वत विकासासाठी

मार्च 2022 । पृष्ठे 36

आजादी की राहपर अभियानात, सामील व्हा!



स्वातंत्र्याचं झालं काय!
आमच्या हाती आलंय काय!!

आंदोलन
शाश्वत विकासासाठी
जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष तेरावे, अंक आठवा

मार्च २०२२ ॐ मूल्य रु. २०/-

■ **संपादक मंडळ**
मेधा पाटकर
सुनीती सु. र., मिलिंद चंपानेरकर,
किशोर बेडकीहाळ, साधना दधीच,
रवींद्र रु. पं., सुरेश सावंत,
उत्पल व. बा., मधुरेश कुमार

■ **कार्यकारी संपादक**
संजय मंगला गोपाळ
९८६९९८४८०३

■ **व्यवस्थापक**
शरद जोशी
७०४५००३६४०

■ **पत्रव्यवहार व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
आंदोलन शाश्वत विकासासाठी
द्वारा शरद जोशी
बी/ ९, मेघमल्हार, गावंड पथ,
मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा,
ठाणे (प.) ४००६०२

■ **अक्षर मांडणी**
समर्थ इन्फोटेक, दादर, मुंबई

■ **मुखपृष्ठ मांडणी**
प्रतीक ठाकूर

■ **मुखपृष्ठावरील छायाचित्रे**
'आंदोलन'च्या संग्रहातून व इंटरनेटवरून

■ **मुद्रणस्थळ**
श्री गुरुकृपा प्रिंटर्स, माहिम, मुंबई - १६

■ **शाश्वत विकास न्यासाचे कार्यालय :**
द्वारा - ६, राघव, श्री रघुराज सोसायटी,
सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०

■ दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होते.

कार्यकर्ते/विद्यार्थ्यांना वर्गणीत सवलत मिळू शकेल.

खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर सवलतीसाठी संपर्क साधा.

आंदोलन शाश्वत विकासासाठीची वर्गणी भरा आता ऑनलाईन!

Name of A/c.: Andolan Shashwat Vikasasathi
Bank Of India, Naigaum Cross Road Branch, Dadar (East), MUMBAI 400014. Current A/c No.: 003520110001099, IFSC: BKID0000035

वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर मेसेज करून लागलीच कळवा! ईमेल : andolan.magazine@gmail.com
मोबाईल : 9869984803/ 9869392013/ 7045003640

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २६ अंक ३

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा,२९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. २५०/- संस्था - रु. ३००/-
१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. २,५००/- संस्था - रु. ३,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट 'आंदोलन शाश्वत विकासासाठी' ह्या नावाने काढावा. • वर्गणी शक्यतो चेक/ड्राफ्टनेच पाठवावी • तसे शक्यच नसल्यास मनिऑर्डरने पाठवावी. • चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवावी.

संपादकीय

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (जआंरास) हा देशाच्या संविधानावर विश्वास असणाऱ्या आणि गोर-गरीब जनतेच्या शाश्वत विकासासाठी सनदशीर मार्गाने प्रयत्न करणाऱ्या विविध संस्था–संघटनांचा मंच आहे. **जआंरास** कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नाही. लोकांचे प्रश्न धसास लावणारी ही जन चळवळ आहे. निर्माण कार्य, एकजुटता आणि वेळप्रसंगी संघर्ष या मार्गाने गेली सुमारे २७ वर्षे **जआंरास** देशभर कार्यरत आहे.

भारताच्या स्वातंत्र्याचे हे पंचाहत्तरावे वर्ष. भारताला स्वातंत्र्यमिळाले आणि भारताचे संविधान अस्तित्वात आले. संविधानाने भारतातील आपणा सर्वांना नागरिकत्व बहाल केले आणि आपल्याला मूलभूत हक्क प्राप्त झाले. घटनेनुसार भारत लोकशाही राष्ट्र आहे व येथे सर्व धर्मीय समान आहेत. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तराव्या वर्षात पदार्पण करताना आजच्या एकूण सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थितीची युवकांची समज, जाण व म्हणणे जनतेसमोर यावे यासाठी **जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय** या देशव्यापी मंचाने शालेय, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय आणि खुला गट अशा चार स्तरांवर विविध स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

अन्य महत्वपूर्ण उपक्रम

राज्य आणि जिल्हा व स्थानिक पातळीवर आयोजित या विविध स्पर्धांशिवायही काही महत्वाचे उपक्रम आगामी काळात नियोजित आहेत. स्वातंत्र्य आंदोलनाशी काडीमात्र संबंध न ठेवणारे, उलटपक्षी स्वातंत्र्य आंदोलनाची यथेच्छ बदनामी करणारे आज सत्तेवर बसून सारा इतिहासच उलट-सुलट करण्याचे कारस्थान करीत असताना, स्वातंत्र्य आंदोलनाचा उज्ज्वल इतिहास उजागर करणे आणि त्याबाबत वास्तव माहिती समाजासमोर आणणे आवश्यक आहे. त्यासाठी आपापल्या जिल्ह्यातील शहीद स्वातंत्र्य सेनानी आणि शहीद स्थळे यांची माहिती एकत्र करण्याचे काम सुरू झले आहे. या बाबत अधिक माहितीसाठी संपर्क – सदाशिव मगदुम: ७२७६१५८७४०

त्याच बरोबर स्वातंत्र्यानंतर अनेक जन आंदोलनांनी, स्वराज्य मिळाल्यावर देशाचे सुराज्य बनवण्यासाठी जे प्रयत्न केले, भूमी हक्क कायदा, रोजगार हमी कायदा, माहितीचा अधिकार, विनाशकारी मोठी धरणे व प्रकल्प याविरुद्ध निर्णय ते अगदी अलिकडेच तीन जुलमी कायदे रद्द करण्यासाठी झालेले अभुतपूर्व शेतकरी–कष्टकरी आंदोलन अशा सर्व जन हितवादी चळवळींचा लेखाजोखाही या निमित्ताने संकलीत करून समाजासमोर आणण्याचा प्रयत्न असणार आहे. या बाबत अधिक माहितीसाठी संपर्क – ज्योती केळकर: ९९६९६१२९९.

स्वातंत्र्य आंदोलनातील शहीद व्यक्ती, स्थळे आणि स्वातंत्र्योत्तर काळातील वैशिष्ट्यपूर्ण जन आंदोलने यांच्याशी संबंधित वैशिष्ट्यपूर्ण स्थळे राज्याच्या नकाशावर चिन्हित केलेला राज्याच्या गौरवशाली इतिहासाचा दस्तावेज ठरेल असा नकाशा या निमित्ताने प्रकाशित करण्याचा मानस आहे. या सर्व ठिकाणांना जोडणाऱ्या स्थानिक–जिल्हा स्तरीय–विभागीय व्यापक यात्रा आणि अशा स्थळांवर युवा शिबिरे, जाहीर कार्यक्रम असे नियोजन आहे. या बाबत अधिक माहितीसाठी संपर्क – साधना शिंदे: ९४२३७४०५८९.

यासाठी राज्य स्तरावरील सुकाणू समिती कार्यरत असून राज्यातील बहुतेक जिल्ह्यात या कामाला दिशा देण्याकरिता जिल्हा संयोजक आणि समित्या निवडण्यात आलेल्या आहेत. मार्च महिन्यात या संदर्भात राज्यभर या समितिच्या सहकाऱ्यांचे दौरे आयोजित होणार आहेत. अधिकाधिक नागरिकांना या अभियानाची माहीती नियमित मिळत रहावी यासाठी सोशल मिडिया गट सक्रीय असून याची वेबसाईटही तयार करण्यात येणार आहे. या बाबत अधिक माहितीसाठी संपर्क – सिरत सातपुते: ८१४९६७३९२.

वाचकांना नम्र आवाहन

अंकातील या पानांच्या प्रती काढून व्यापक प्रमाणात वितरीत कराव्यात आणि हे अभियान सर्वदूर पोहोचवण्यासाठी

(पान ७ वर)

खास वृत्त

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय आयोजित स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त स्पर्धांविषयीचा संक्षिप्त तपशील

राज्यस्तरीय महाविद्यालयीन, शालेय आणि खुल्या गटातील स्पर्धेत, स्पर्धक आपल्या घरात बसून सहभागी होऊ शकेल. ज्या स्पर्धेत भाग घ्यायचा असेल त्या स्पर्धेतील आपली कलाकृती ऑन लाईन, ई-मेल, व्हॉट्स अप किंवा टपालाने पाठविता येईल. **कलाकृती पाठवण्याची अंतीम तारीख आहे ३० एप्रिल २०२२. मात्र, स्पर्धकांसाठी खास सूचना: अंतिम तारखेपर्यंत वाट न पाहता आपल्या परीक्षा तारखांनुसार स्पर्धेत भाग घ्या. ज्यांच्या परीक्षा मे महिन्यात आहेत त्यांना आत्ताच स्पर्धेची तयारी करता येईल**.

सहभागी प्रत्येक स्पर्धकाला सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. सर्व स्पर्धा विनाशुल्क आहेत. आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे विषय, पारितोषिके आणि अधिक माहीतीसाठीचे संपर्क पुढे देत आहोत. स्पर्धेचे नियम, अटी, कलाकृती कुठे, कशा पाठवायच्या याबाबत संबंधित मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून माहिती घ्यायची आहे. ***अपरिहार्य कारणांमुळे स्पर्धेच्या आयोजनाबाबत काही बदल करावे लागल्यास, स्पर्धा समितीचा निर्णय अंतिम असेल.***

राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

स्पर्धेचे विषय

कनिष्ठ महाविद्यालयीन गट

१. ऑनलाइन शिक्षण फायदे, तोटे
२. सावित्री घरोघरी, जोतिबाचा शोध जारी
३. लॉकडाऊनचे प्रभाव व परिणाम
४. माझ्या कुटुंबातील लोकशाही
५. पर्यावरण संरक्षण: काळाची गरज

वरिष्ठ महाविद्यालय व खुला गट

१. राष्ट्रीय एकता आणि भारताची राज्यघटना
२. धार्मिकता की धर्मांधता
३. लोकशाही जनतंत्र: दशा आणि दिशा
४. शेती वाचवण्याच्या प्रयत्नांची दिशा
५. पर्यावरण आणि विकास: हातात हात की एकमेकांवर आघात?

पारितोषिक: प्रत्येक गटातील पहिल्या तीन क्रमांकांना अनुक्रमे रु.३०००/-, २०००/-, १०००/- अशी रोख पारितोषिकेदेण्यात येतील. परीक्षकांच्या शिफारसी नुसार रु.५००/- रकमेची काही उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येतील. अधिक माहितीसाठी संपर्क - ईला कांबळी: ९९२२८५४८१८

राज्यस्तरीय लघुपट (Short Film) स्पर्धा

या स्पर्धेत कमीत कमी १४ वर्षाच्या मुलामुलींपासून कितीही वर्षाची व्यक्ती भाग घेऊ शकते. लघुपटासाठी विषय: 'स्वातंत्र्य' या विषयावर जास्तीत जास्त ५ मिनिटांचा लघुपट बनवून ऑनलाइन पाठवायचा आहे. पारितोषिक: पुरस्कार प्राप्त पहिल्या तीन लघुपटांना रुपये ३०००/-, २०००/-, १०००/- आणि उत्तेजनार्थ रु. ५००/- असे पुरस्कार दिले जातील. या शिवाय विजेत्यांसाठी प्रसिद्ध लघुपटकारांचा विशेष वर्कशॉप आयोजित केला जाईल. अधिक महितीसाठी संपर्क - शिल्पा बल्लाळ: ९८३३८८७२१२

राज्यस्तरीय चित्रकला/पोस्टर स्पर्धा

शालेयगट: इयत्ता ६वी ते १०वी

स्पर्धेचे विषय

१. स्वातंत्र्य लढा
२. सर्व धर्म समभाव
३. लेक वाचवा देश वाचवा
४. आम्ही भारतीय

कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालय खुला गट

स्पर्धेचे विषय

१. स्वातंत्र्य लढा
२. सर्वधर्म समभाव, समता, बंधुता
३. स्वातंत्र्य:काल–आज–उद्या
४. आजचा भारत
५. पर्यावरण संरक्षण

पारितोषिक: निवडलेल्या १० सर्वोत्कृष्ट चित्र/पोस्टरना प्रत्येकी रु. १०००/- चे बक्षिस दिले जाईल. अधिक माहीतीसाठी संपर्क - अमोल पाटील: ९६०४०७०६६३

राज्यस्तरीय कविता/गीतस्पर्धा

ही स्पर्धा माध्यमिक विद्यालय (इ. ८ वी ते १० वी), कनिष्ठ महाविद्यालय (इ.११ वी, १२ वी), वरिष्ठ महाविद्यालय व खुल्या गटासाठी (वयाची अट नाही) आहे. स्वातंत्र्याच्या वाटेवर या विषयावर मराठी, हिन्दी वा इंग्रजीमध्ये कविता वा गीत लिहावे. पारितोषिक: निवडलेल्या १० सर्वोत्कृष्ट कविता/गीत यांना प्रत्येकी रु. १०००/- चे बक्षिस दिले जाईल. अधिक माहीतीसाठी संपर्क - मीनल उत्तुरकर: ९८३३११३४१४

राज्यस्तरीय घोषणा/नारे स्पर्धा

स्पर्धेचे विषय

आझादी च्या ७५व्या वर्षानिमित्त, विस्थापन, जल-जंगल-जमिनीवर अधिकार, संविधान, स्त्री-पुरुष समानता, शिक्षणाचा अधिकार, आरोग्याचा अधिकार, जगण्याचा अधिकार, रोजगाराचा अधिकार, शेतकरी–कष्टकरी, जातीभेद, धर्मभेद अशा विविध प्रश्नांना धरून दोन ओळीत किंवा त्याच्याही कमी शब्दात घोषणा लिहू शकता. पारितोषिक: निवडलेल्या १० सर्वोत्कृष्ट घोषणा/नारे यांना प्रत्येकी रु. १०००/- चे बक्षिस दिले जाईल. अधिक माहीतीसाठी संपर्क - चेतन साळवे: ९३०७५७९९०४

राज्यस्तरीय समाज भान चाचणी

ही चाचणी 'ओपन बुक' स्वरूपाची आहे. या चाचणीत शालेय व शालाबाह्य किशोरवयीन, मुले-मुली तसेच नव युवक-युवतींना भाग घेता येईल. गट १ - इयत्ता ५ते ८ - जन्म - जानेवारी २००८ ते डिसेंबर२०११. गट २ - इयत्ता ९ ते १२ - जन्म - जानेवारी २००४ ते डिसेंबर२००७. प्रत्येक गटासाठी स्वतंत्र प्रश्नावली आहे. प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी पुस्तकांच्या बरोबर आपल्या परिसराचे, आसपासचे वाचन निरीक्षणही करावे लागेल. लोकांशी संवाद साधावा लागेल. इंटरनेटची मदतही घेता येईल. एक प्रकारे ही एक खुली परीक्षा असेल. अधिक माहितीसाठी संपर्क - प्रा. विनय र. र.: ९४२२०४८९६७

जिल्हा/स्थानिक स्तरावरील स्पर्धा

राज्यस्तरीय स्पर्धात, स्पर्धकाला कुठेही प्रत्यक्ष जमा न होता स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. मात्र काही स्पर्धा या प्रत्यक्ष भेटल्याशिवाय आयोजित करणे दुरापास्त आहे. अशा स्पर्धा जिल्हा किंवा स्थानिक स्तरावर आयोजित करण्यात येतील.

वक्तृत्व स्पर्धा

स्पर्धेचे विषय

माध्यमिक विद्यालय गट

१. वीज नसेल तर
२. समान शिक्षण समानशाळा
३. स्त्री शिक्षणातील उणीवा

कनिष्ठ महाविद्यालयीन गट

१. ऑनलाईन शिक्षण: फायदे आणि तोटे.
इंग्रज भारतात आलेच नसते तर.
२. सन २०२१ मधे लागलेला महत्वाचा शोध.

वरीष्ठ महाविद्यालयीन गट व खुला गट

१. सावधान -ध्रुव वितळू लागले आहेत.
२. जन आंदोलनांची गरज.
३. जाती निर्मुलनाकडे कशी वाटचाल करता येईल ?

प्रत्येक गटातील पहिले तीन क्रमांक मिळविलेल्या स्पर्धकांना अनुक्रमे रु. २,०००/-, रु. १,५००/- आणि रु. १,०००/- अशी रोख पारितोषिके देण्यात येतील. अधिक माहीतीसाठी संपर्क - राजेंद्र बहाळकर: ९८२२५९६३७०

पथनाट्य स्पर्धा

आजादी की राह पर या संकल्पनेला अनुसरून पथनाट्य असावे. देशाची सद्यस्थिती, युवा वर्गाला भेडसावणारे प्रश्न,

(पान ७ वर)

राजकारण

अनारोग्याचे राज्य

शाह आलम खान

देशातील सर्वात जास्त लोकसंख्येचे राज्य सद्या नवीन सरकारच्या निवडणुकीत व्यस्त आहे. लोकसंख्येत सर्वात पुढे असलेलं हे उत्तर प्रदेश राज्य दुर्दैवाने आरोग्याच्या बाबतीत सर्वात वाईट राज्यांच्या पंक्तीत आहे. हल्लीच प्रसिद्ध झालेल्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य पाहणी-५ (NFHS -National Family Health Survey–5) मध्ये उत्तरप्रदेशची कामगिरी जम्मू काश्मीरसारख्या अशांत राज्यांपेक्षाही वाईट आहे. यामुळे हे उघड होतंय की कोविड काळात या राज्याची नोंदवली गेलेली वाईट कामगिरी त्या वेळेपुरती नव्हती तर त्या राज्याच्या सरकारने आरोग्याच्या बाबतीत केलेल्या निष्काळजीपणाचा तो परिपाक होता. आता चालू असलेल्या निवडणुकीच्या प्रचारात हे स्पष्ट होतंय की प्रचाराचे मुद्दे आधीच ठरले आहेत आणि कोणालाच लोकांच्या आरोग्यावर चर्चा करायची नाहीये.

तसं बघितलं तर आरोग्य, शिक्षण हे आपल्या देशातील निवडणुकीत कधीच प्रचाराचे मुद्दे नव्हते; पण गेल्या दोन वर्षात थैमान घातलेल्या कोविड साथीमुळे हे मुद्दे ऐरणीवर आले आहेत आणि या रोगाची आणि त्यामुळे झालेल्या मृत्युंची जबाबदारी कोणाची हे जाणणे अत्यावश्यक झाले आहे. अगदी ब्राजील, फिलिपाईन्ससारखे टोकाच्या उजव्या विचारसरणीचे देश सुद्धा लोकांच्या आरोग्याबद्दल बोलू लागले आहेत.

NFHS-5 मधून आपल्या देशाच्या आरोग्य व्यवस्थेच्या वाईट अवस्थेचे दारुण चित्र उभे राहते आहे. त्यात उत्तर प्रदेश राज्याचा निकाल तर अति खालचा आहे आणि तो नीट करण्यासाठी आधी त्याची जबाबदारी नक्की करणं गरजेचं आहे. NFHS-5 प्रमाणे उ.प्र. मधील बाल मृत्युंचा दर (Infant Mortality Rate (IMR) 1000 जिवंत बालकांमागे ५०.४ इतका आहे. हा दर जगातल्या सर्वात जास्त अशांत किंवा संघर्षमय असलेल्या देशांपेक्षाही जास्त आहे. उदाहरणार्थ सिरियाचा IMR 1000 जिवंत बालकांमध्ये १६ इतका आणि इराकचा IMR 1000 जिवंत बालकांमागे २० इतका आहे. यात सुद्धा उ.प्र. मध्ये ५ वर्षांखालील बालकांचे मृत्युचे प्रमाण अजूनच भयावह आहे; १००० जिवंत जन्मलेल्या बालकांमागे ५९.८! सिरिया मध्ये सुद्धा हा दर १००० जिवंत बालकांमागे १६ असा आहे. आणि जम्मू काश्मीरमध्ये हा दर १००० जिवंत बालकांमागे ९.८ इतका आहे. IMR आणि ५ वर्षांखालील बाल मृत्युंचा दर हे दोन्ही जनतेच्या आरोग्याच्या परिस्थितीचे महत्वाचे निर्देशांक आहेत. उत्तर प्रदेशसाठीचे हे दर संयुक्त राष्ट्रांनी निश्चित केलेल्या आणि आपल्या देशाने स्वीकारलेल्या २०३० साठीच्या शाश्वत विकासाचे ध्येय ३ मध्ये ठरलेल्या आकड्यांच्या जवळपासही नाही. हे ध्येय जगातील सर्व लोकांच्या आरोग्य आणि सार्वत्रिक कल्याणासाठी निश्चित केले आहे.

उत्तर प्रदेशच्या NFHS-5 मध्ये आलेल्या धोकादायक आकड्यांमुळे त्या राज्याच्या जनतेच्या आरोग्याबद्दल वाईट वाटत असेल तर त्या राज्याचे आरोग्याबाबतचे इतर आकडेही तेवढेच धक्कादायक आहेत. पाच वर्षाखालील ३९.७ टक्के मुलांची वाढ खुंटलेली आहे. ६ ते ५९ महिन्यांच्या बालकांमध्ये तब्बल ६६.४ मुलांमध्ये रक्तक्षय आहे, ते ॲनिमिक आहेत, आणि ही संख्या NFHS-4 च्या ६३.४ टक्क्यांपेक्षा वाढली आहे. जागतिक पोषण अहवाल २०२१ नुसार दक्षिण सुदान या जगातील सर्वात कुपोषित देशात सुद्धा ५ वर्षाखालील वाढ खुंटलेल्या मुलांची संख्या ३१.३ टक्के आहे. उत्तर प्रदेश मध्ये रक्तक्षय असलेल्या प्रजननक्षम स्त्रियांची संख्या ५०.४ टक्के आहे, तीच संख्या दक्षिण सुदान मध्ये ३५.६ टक्के आहे. म्हणजेच उत्तर प्रदेश मध्ये जगातील कोणत्याही इतर भागापेक्षा जास्त कुपोषित बालके आणि ॲनिमिक स्त्रिया आहेत. ॲनिमिया आणि कुपोषण हे दोन्ही अनेक साथीच्या रोगांचे आणि मृत्युंचे माहेरघर आहेत.

या वरून आश्चर्य वाटायला नको की उत्तर प्रदेशमध्ये देशातील सर्वात जास्त टीबीचे रुग्ण आहेत आणि त्यांची संख्या देशातील सर्व टीबी रूग्णांच्या २० टक्के भरते. २०२० मध्ये उ.प्र. मध्ये टीबीचे ४ लाख रुग्ण होते तेव्हाच बाजूच्या बिहार राज्यात टीबी रुग्णांची संख्या १.२३ लाख होती. गेली कित्येक दशके बिहारमध्ये टीबी चे रुग्ण जास्त असत. यापेक्षाही गंभीर गोष्ट म्हणजे टीबीचा सर्वात घातक प्रकार म्हणजे मल्टी ड्रग रझिस्टंट टीबी (MDR –TB), याचे दोन क्रमांकाचे रुग्ण उ.प्र. मध्ये आहेत. साथीचे रोग

सुद्धा उत्तर प्रदेश मध्ये नियमित हजेरी लावतात. २०१७ साली गोरखपुरमध्ये सरकारी हॉस्पिटलमध्ये अनेक बालकांचा Acute Encephalitis Syndrome (AES) या जीवघेण्या आजाराने मृत्यू झाला होता. हे प्रकरण म्हणजे कुपोषित बालकांची रोगप्रतिकारक शक्ति कमी असण्याने रोग होण्याबद्दलची वाढती शक्यता आणि सरकारी अनास्था यांचे दुर्दैवी मिश्रण आहे. AES ची साथ आणि त्याने झालेले मृत्यू उत्तर प्रदेशाला नवीन नाहीत; २०१४ मध्ये ५८५०, २०१५ मध्ये ६९१७ आणि २०१६ मध्ये ६१२१ बालकांचे मृत्यू त्या राज्याने पाहिले आहेत. मलेरिया आणि डेंग्यूच्या साथी नेहमीच येत असतात. नोव्हेंबर २०२१ मध्ये डेंग्यूच्या रुग्णांची संख्या २३००० च्या पुढे पोहचली होती जी २०१६ नंतरची सर्वात जास्त संख्या होती. इथे मी कोविडच्या दुसऱ्या लाटेमध्ये झालेल्या भयानक मृत्यू तांडवाबद्दल बोलायचे टाळतो आहे.

आधी म्हटल्याप्रमाणे पारंपरिकरित्या राजकारण्यांच्या कल्पनेमध्ये लोकांच्या आरोग्याच्या प्रश्नाचा विषय येत नाही. लोकांनी आपल्या आरोग्याची काळजी आपण घ्यावी असा समज करून दिला जातो. पण गेल्या दोन वर्षातील कोविड साथीमुळे आरोग्याचा विषय चर्चेमध्ये यायला लागला आहे. पण लोकांनी कोविडची साथ आणि त्यामुळे झालेले मृत्यू विसरून जावं या कडे राजकारण्यांचा कल आहे कारण त्या स्मृति जागत राहिल्या तर तेव्हाच्या निष्काळजीची, अनास्थेची आणि मृत्युची जबाबदारी कोणीतरी घ्यावी लागेल आणि जबाबदारी घ्यायची म्हटली म्हणजे निवडणुकींमध्ये पंचाईत ! उत्तर प्रदेशमध्ये जशी जशी निवडणूक जवळ येत होती तसतसा आरोग्य विषय मागे पडून मंदिर, मस्जिद, लव जिहाद आणि हिजाब हे विषय पुढे येऊ लागले. पण जर प्रश्न विचारणे बंद केले तर आरोग्याचा प्रश्न अधिकाधिक जटिल होत जाईल. उत्तर प्रदेशमधील मतदात्यांनी हे लक्षात ठेवलं पाहिजे की जेव्हा बेजबाबदार लोकं लव जिहाद, हिजाब, मंदिर किंवा मस्जिद वर बोलणं बंद करतील तेव्हा कुठेतरी या रामाच्या राज्यात काही शेकडो बालके, स्त्रिया आणि पुरुष कुपोषण, AEB, ॲनिमिया किंवा टीबी यापैकी कशाने तरी शेवटचा श्वास घेत असतील.

(इंडियन एक्सप्रेसच्या सौजन्याने)

अनुवाद: मीनल उत्तुरकर
meenal16@gmail.com

(संपादकीय: पान ३ वरून)

हातभार लावावा आणि या देशसेवेच्या कामात बहुमोल सहकार्य करावे. या संदर्भात आपणास काहीही अधिक माहिती हवी असल्यास, **जआंरास** राज्य समन्वयक युवराज गटकळ (९३२६३४९४१५), राष्ट्रीय समन्वयक सुनिती सु. र.(९४२३५७१७८४) किंवा आजादी ७५-स्पर्धा संयोजक डॉ.संजय मंगला गोपाळ (९८६९९८४८०३) या पदाधिकाऱ्यांशी नि:संकोच संपर्क साधावा, ही विनंती.

संजय मं. गो., कार्यकारी संपादक

(खास वृत्त: पान ५ वरून)

संविधानातील मूल्ये अशा विविध पैलूंवर पथनाट्य सादर होऊ शकेल. बाकी विषय किंवा थीम बाबत स्वातंत्र्य आहे. पथनाट्य कमीत कमी १० व जास्तीत जास्त २० मिनिटांचे असावे. पथनाट्यात कलाकार संख्येवर बंधन नाही. पथनाट्य गोलाकार रंगमंच पद्धतीने म्हणजे सर्व बाजुंनी प्रेक्षक व मध्ये नाटक या स्वरूपात असणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- अविनाश कदम: ९८६९०५५३६४

समूहगायन स्पर्धा

स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची मूल्ये सांगणारी, देशभक्तीपर, शोषणाच्या आणि विषमतेच्या विरोधातील बंड/विद्रोह करणारी क्रांती गीते यांचा समूहगीत गायनात समावेश असावा. माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय या तीन स्तरावर या स्पर्धा होतील. शाळा/महाविद्यालय प्रत्येकी एका संघाला सहभाग घेता येईल. कमीत कमी ६,जास्तीत जास्त १२ जणांचा समूह असेल. मुले/मुली एकत्र सहभाग असावा. भारतीय वाद्यांचा वापर करावा. हिंदी/मराठी भाषेतील गीत असावे. पोषाखाचेही गुणांकन होईल. वेळ कमीत कमी ५ ते जास्तीत जास्त ७ मिनिटे. अधिक माहितीसाठी संपर्क- बाबासाहेब नदाफ: ९८५०९७४१९४

आपले विनीत,

युवराज गटकळ, राज्य समन्वयक: ९३२६३४९४१५, सुनिती सु. र., राष्ट्रीय समन्वयक: ९४२३५७१७८४, डॉ. संजय मंगला गोपाळ, आजादी ७५-स्पर्धा संयोजक: ९८६९९८४८०३.

टिप्पणी

गांधीजी अधिकच श्रेष्ठ...

विमल भाई

भारतात त्यावेळी इंग्रजांचं भयकारी शासन होतं. बिहारच्या चंपारण्य भागातल्या शेतकऱ्यांवर नीळ पिकवण्याची सक्ती केली जात असे. गांधीजी ते पाहण्यासाठी गेले. त्यांना अटक झाली. गांधीजींनी जामीन घेण्यास नकार दिला. न्यायमूर्तींना नाईलाजाने गांधीजींना सोडावं लागलं. गांधीजींचा भारतातला प्रवास इथंच सुरू झाला आणि ३० जानेवारी १९४८ ला त्याची अखेर झाली.

आज चंपारण्यमध्ये त्याच गांधीजींची मूर्ती तोडण्यात आलेली आहे. योगायोग म्हणजे गांधीजींचे पाय मात्र तसेच शाबूत आहेत; जणू ते संदेश देत आहेत की कोणतीही परिस्थिती आली तरी थांबायचं नाही, चालत राहायचं. ही घटना बिहारमधली आहे, जिथं तथाकथित समाजवादी मंडळी धर्मवादी मंडळींशी हातमिळवणी करून सत्ता चालवत आहेत.

सत्तेच्या आडून गांधीजींच्या मूर्तीची तोडफोड करणं किंवा त्यांच्या खुन्याचा उदोउदो करणं हा आता एक पायंडाच पडलेला आहे. महाशय, तुम्ही त्यांच्या खुन्यांची पूजा बांधा, त्यांना हारतुरे घालून त्यांची प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करा, इतिहासाच्या पुस्तकात फेरफार करा, पण मी हे खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की गांधीजींना संपवणं अशक्य आहे.

गांधीजी म्हणजे व्हॉट्स अप विद्यापीठातून तयार झालेली व्यक्ती किंवा आभासी माध्यमातून उभी केलेली प्रतिमा नाही हे लक्षात असू द्या. गांधीजी म्हणजे भांडवलशाही आणि धर्मांधतेला असलेलं आव्हान आहे. गांधीजींना अहिंसेच्या चौकटीत मर्यादित करण्याचा प्रयत्न केला गेला असला तरी गांधीजी त्या चौकटीत कधीच अडकून पडले नाहीत. मुस्लिम लीग आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गांधीजी हा थट्टेचा विषय व्हावा यासाठी कायमच प्रयत्न केलेले आहेत. असं म्हटलं जातं की गांधीजींच्या विचारधारेनुसार एका गालावर थप्पड मिळाली तर दुसरा गाल पुढे करावा; परंतु हा विचार तर ईसा (येशू ख्रिस्त) यांचा आहे. गांधीजींनी असं कधीच म्हंटलेलं नाही. उलट गांधीजी तर असं म्हणायचे की अहिंसा हे शौर्याचं लक्षण आहे. गांधीजी अहिंसेकडे माघार घेण्याचं तंत्र म्हणून नाही तर एक हत्यार अशा रूपात पाहत असत.

गांधीजींनी स्वत:च्या आयुष्यात साधनशुचितेचं तत्त्व आत्मसात केलेलं होतं. त्यामुळेच त्यांचे विरोधक त्यांच्यावर किल्मिषही उठवू शकले नाहीत. गांधीजी खुद्द गांधीवादाच्या किंवा मूर्तीपूजेच्या विरोधात होते. दुर्दैवाने गांधीजींच्या अनुयायांनी नेमक्या याच दोन गोष्टींना बळ दिलं. असं करणं गांधीजींच्या विचारांच्या विरोधी होतं. डॉ. राम मनोहर लोहिया यांनी गांधींच्या अनुयायांची तीन गटात विभागणी केली होती. सरकारी गांधीवादी, मठाधीश गांधीवादी आणि कुजात गांधीवादी. देशातील कोणत्याही आंदोलनात आपल्या संवैधानिक हक्कांसाठी पुढे येणारे सर्वजण कुजात गांधीवादी वर्गात मोडतात. (कुजात गांधीवादी म्हणजे गांधीवाद्यांनी बहिष्कृत केलेले गांधीवादी. डॉ. लोहियाही स्वत:ला कुजात गांधीवादी म्हणवत!)

गांधीजींची हत्या केलेल्यांनी त्यांचे जितके नुकसान केले त्याहून अधिक नुकसान त्यांच्या विचारांची तोडमोड करून गांधीजींना केवळ संग्रहालयात, पुतळ्यात किंवा अहिंसेच्या चौकटीत कैद करून ठेवणाऱ्यांनी केलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात नेहरूंनी एकदा स्पष्टपणे सांगितलेलं होतं की माझा चरख्यावर विश्वास नाही परंतु मी त्याकडे स्वातंत्र्याचं प्रतीक म्हणून पाहतो. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाने ग्रामकेंद्रित अर्थव्यवस्थेला तिलांजली दिली आणि गांधीजी ज्याला 'वेड्यांची शर्यत' म्हणत असत अशाच मार्गाने आपला देश जाऊ लागला.

गांधीजींच्या प्रतीकांची तोडफोड करणारे हे विसरून जातात की महात्मा बुद्धाच्या बमियान येथील मूर्ती तालिबानने बॉंबने उध्वस्त केल्या होत्या. त्यामुळे बुद्धांचे अनुयायी कमी झाले का? हिंदुत्ववादाच्या घोषणा देत श्रीराम किंवा अन्य देवदेवतांना बदनाम करून, देशाची अर्थव्यवस्था कमकुवत करत सत्ताधीश जे करत

(पान १३ वर)

टिप्पणी

हिजाब-वाद: 'दुसऱ्या'च्या डोळ्यातील कुसळाचं राजकारण!

मिलिंद चंपानेरकर

एक अशी म्हण आहे की, 'दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसतं, पण आपल्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही'. बहुसंख्याकवादी सरकारला ही म्हण अगदी व्यवस्थित लागू होते असंच म्हणावं लागेल. कारण, कर्नाटकमधील 'एनडीए'च्या सरकारात असे अनेक मंत्री आहेत जे सतत आपल्या बुरसटलेल्या विचारांचं दर्शन घडवत असतात आणि मुस्लिमांना 'दुसरे' (अदर) मानणारी विद्वेषी विधानं करत असतात आणि कृतीही करत असतात. त्यांत तेजस्वी सूर्या हे युवा नेते तर अग्रणी आहेत. आता असं राज्य सरकार जेव्हा ५ फेब्रुवारी रोजी कोणतंही मोठं सबळ कारण नसताना तडकाफडकी एक आदेश काढून सरकारी संस्थांमध्ये पदवीपूर्व शिक्षण घेणाऱ्या मुस्लीम मुलींच्या गणवेषासह डोक्यावर हिजाब बांधण्याच्या कृतीवर बंदी घालते, तेव्हा त्याला काय म्हणावं? १९८३च्या एका कायद्याचा आधार घेत राज्य सरकारने हिजाब घालणं ही गोष्ट 'समता, एकात्मता आणि ऐक्य याबाबतच्या संकल्पना आणि शांतता व सुव्यवस्था यांवर अनिष्ट परिणाम घडवणारी' ठरते, म्हणूनच खरोखर त्यावर बंदी घातली, की हिंदू राष्ट्राची संकल्पना साकार करण्याचं बहुसंख्यांकवादी सरकारचं जे 'स्वप्न' आहे (त्यांच्या एका नेत्याने तर लवकरच तिरंग्या ध्वजाच्या ऐवजी भगवा झेंडा फडकवण्याची उघडंच घोषणा केली आहे), ते 'साकार करण्याच्या' दृष्टीने त्यायोगे आणखी एक पाऊल उचललं? गेली सात वर्षं सतत मुस्लिमांना 'दुसरे' वा दुय्यम नागरिक म्हणून हिणवण्याचे, दर्शवण्याचे सातत्याने जे उघड-छुपे प्रयत्न सुरू आहेत, त्याचाच हा एक भाग नाहीये का?

उदारमतवादी व पुरोगाम्यांची भूमिका?

स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालणाऱ्या बुरखा व हिजाबसारख्या गोष्टींबाबत अनेक स्त्री संघटना आणि पुरोगामी संघटना गेली कित्येक वर्षे प्रबोधन करत आहेत आणि अशा जुन्या रुजलेल्या रूढींतून समाज सहज मुक्त होणं साध्य होत नसतं, त्याला दीर्घकाळ लागतो, हे जाणून त्यांचं कार्य हळुवार सुरू असतं. ही गोष्ट सर्वच धर्मियांना लागू होते. किंबहुना, भौतिक परिस्थितीतील बदलांप्रमाणेच अशा चळवळींच्याही परिणामस्वरूप आज कित्येक सुशिक्षित स्त्रिया प्रस्थापितांचा विरोध पत्करून रुढींची व कर्मठ विचारांची बंधनं झुगारून आत्मविश्वासाने पुढे जात असल्याचं चित्र आहे. परंतु, हे सर्व जाणूनही जेव्हा राज्यकर्ते 'बंदी' सारखे तडकाफडकी आदेश काढून आघात करतात, तेव्हा ते अशा हळुवार बदलाच्या प्रक्रियेमध्ये बाधा आणतात आणि पर्यायाने त्या धर्मातील मूलतत्ववादी उजव्या शक्तींचे हात बळकट करतात. इतकंच नाही तर, शिक्षणामुळे तार्किक विचार करून आपला विकास करू पाहणाऱ्या अनेक सुशिक्षित युवक-युवतींच्या मनात अशा कृतक आघातांमुळे सामाजिक असुरक्षिततेची भावना बळावते आणि परिणामी ते अतिरेकी, मूलतत्त्ववादी संघटनांकडे खेचले जातात. असं सर्व असताना, जेव्हा राज्यकर्ते केवळ स्वत:च्या राजकीय हितासाठी बेजाबादारपणे आणि केवळ एका समाजघटकाला 'दुसरे' (दि अदर)म्हणून दर्शवण्याच्या हेतूने अशा आघाती कृती करतात, तेव्हा समाज सुधारणा अभिप्रेत असलेल्या घटकानेही निशंक मनाने आणि पुरेशा स्पष्टतेने अशा कृतींचा विरोध करायला हवा. कारण, एकतर समाजातील प्रतिगामी रूढी-बंधनांबाबत त्यांची भूमिका काय आहे वा होती, ते सर्व जाणून असतात. परंतु, वस्तुस्थिती अशीसुद्धा आहे की, हा घटक त्या आघाती कृतीचा व्यापक स्तरावर विरोध करताना दिसत नाही. उलट पुरोगामी याबाबत विभागलेले दिसतात आणि त्यामुळे तर प्रस्थापितांचे आणि हिंदू व मुस्लीम दोन्ही उजव्या शक्तीने चांगलेच फावते. आणि परिणामी काय घडतं?

वादाच्या 'सीमितीकरणा'चे परिणाम

पदवीपूर्व शिक्षण घेणाऱ्या मुस्लीम मुलींनी युनिफॉर्मसह डोक्यावर हिजाब बांधला तर कुणाला काही उपद्रव होत होता का? तसं केल्यास विद्यार्थिनींना संस्थेच्या आवारात प्रवेश करण्यास मनाई करण्याइतकी अशी ती अनिष्ट गोष्ट होती का? आणि शैक्षणिक सत्र सुरू असताना, परीक्षा महिन्याभरावर आल्या असताना कर्नाटक राज्य सरकारला अचानक ५ फेब्रुवारीला हिजाबवर वा अन्य धार्मिक ओळख दर्शवणाऱ्या कपड्यांवर बंदी घालणारा आदेश काढण्यासाठी खूपच मोठं तातडीचं कारण होतं का? वास्तविक, या मुद्द्यावर याचिका करणाऱ्यांचे

वकील ॲडव्होकेट संजय हेगडे यांनी सुनावणीच्या सुरुवातीलाच, शासकीय आदेशाची अंमलबजावणी मे महिन्यापर्यंत स्थगित करावी जेणेकरून, केवळ मुलींनाच नाही, तर सर्व विद्यार्थ्यांनाही आपल्या परीक्षा शांतचित्ताने पार पाडता येतील, अशी विनंती केली होती. पण त्याचीही दखल घेतली गेली नाही. कोण म्हणतं की, 'शहाणपण प्रबळ ठरतं' ('विसडम प्रीव्हेल्स') ? सद्य काळात ही उक्ती लागू होणंच अशक्य ! कारण, मुळात राज्यशासनच जाणीवपूर्वक, हेतूपूर्वक त्यांच्या व्यापक 'अजेंड्या'नुसार आगळीक करत असेल, तर तर्कसंगत विचारांना वाव कसा राहणार ? सूज्ञपणाची सूचना लक्षात घेण्याचा समजूतदारपणा शासनाने दाखवला नाही, आणि मग न्यायालयाने यात घटनात्मक मुद्यांच्या बाबी असल्याने याचिकांची प्रकरणं मोठ्या खंडपीठापुढे वर्ग करण्याचे आदेश दिले आणि त्याचप्रमाणे, संबंधितांना सुनावणी होईस्तोवर शासनाच्या आदेशाचे पालन करण्याबाबत निर्देश दिले व या मुद्यावर वणवा पेटू नये, म्हणून तीन दिवस सर्व शाळा-कॉलेजं बंद ठेवण्याचे आदेश दिले.

सुरुवातीलाच असा सर्व गोंधळ झाल्याने प्रकरण निष्कारण आणखी चिघळलं आणि त्याचा फायदा उठवणाऱ्या दोन्ही उजव्या शक्तींना मोकळं मैदान मिळालं. अशा वेळी डाव्या-पुरोगामी शक्तींनीवेगवेगळ्या भूमिका मांडायला सुरुवात केल्यावर तर उजव्या शक्तींचं चांगलंच फावलं. अशा सर्व गोष्टींचे अत्यंत विदारक असे 'दृश्य परिणाम' दिसून आले. हिजाब-धारी विद्यार्थिनी कॉलेजच्या गेटवर जात आहेत आणि कॉलेजचे प्राधिकारी फाटक बंद करून आवारात प्रवेश करण्यापासून त्यांना मज्जाव करत आहेत... 'मुस्कान' नावाची युवती बुरखा घालून कॉलेजकडे जात असताना भररस्त्यात भगव्या शाली व दुपट्टाधारी टवाळ मुलांचा जमाव 'जय श्रीराम'च्या घोषणा देत तिच्या मागे लागला आहे... ती झुंजारपणे त्यांना प्रत्युत्तर देत धावपळीने पुढे जात आहे.. मध्येच 'अल्ला हो अकबर'चा नारा देत आहे... जर का अशी दृश्यं उजव्या हिंदुत्ववादी 'भक्तां'ना वा उजव्या मूलतत्त्ववादी मुस्लिमांना 'सुखदायी' वाटत असतील, तर एकंदर कठीणच आहे ! शासनाने छेड काढणाऱ्या मुलांवर कारवाई केली नाही, पण आदेशाचा निषेध करणाऱ्या पंधरा मुलींवर मात्र 'एफ आय आर' दाखल केले !

तरुणांच्या मनात विष कालवण्याचे 'अभिनव' प्रकार !

शाळा-कॉलेजात जाणाऱ्या किशोरवयीन मुला-मुलींना धार्मिक चिन्हकांच्या मुद्यावर एकमेकांविरुद्ध उभं करण्याचे दीर्घकालीन परिणाम त्यांच्या संवेदनशील व संस्कारक्षम मनावर काय होतील, याचा विचार करण्याचं भान सद्यकाळात राहिलेलं नाही आणि बहुसंख्यांकवादी राजकारण पुढे नेण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात हेच त्यातून दिसून आलं. अशा वेळी खरंतर पुरोगाम्यांची जबाबदारी अधिक वाढते. परंतु, तसं झाल्याचं दिसून आलं नाही.

एकीकडे, भगवे दुपट्टे वा शाली ल्यालेल्या युवकांची टोळकी मुस्लीम मुलींना भररस्त्यात, दिवसाउजेडी घाबरवण्यात आनंद मानत आहेत आणि त्यांना उत्तेजन दिलं जात आहे असं चित्र आणि दुसरीकडे, पुरोगाम्यांमधील काही घटक, 'आम्ही हिजाबचे समर्थन करत नाही' असं म्हणून मोकळे होताना दिसले तर काही, त्या मुली 'कॅंपस फ्रंट ऑफ इंडिया'च्या (पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाचीच शाखा) आहेत' असं म्हणून हात वर करताना दिसले. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलींना केवळ हिजाब घातला म्हणून कॉलेजच्या आवारात प्रवेश दिला जात नाही आणि त्यामुळे त्या मुलींना कॉलेजच्या गेटजवळ निषेधाच्या घोषणा देत आंदोलन करावं लागतं हे तर चित्र विपरीत होतंच; पण नंतर तसं चित्र टीव्हीच्या वाहिन्यांवर दिसू नये म्हणून त्यांना आत प्रवेश देऊन वेगळ्या वर्गात बसवलं जातं–तिथे शिक्षक वर्ग घेणार नाहीत वा त्यांना 'ऑनलाईन' क्लासच्या सोयीचाही वापर करता येणार नाही - असं स्पष्ट केलं जातं हे तर अगदीच भीषण चित्र ! अशा वेळी त्यांचा अभ्यास, परीक्षा याला सर्वाधिक तातडीचं समजायचं की, हिजाब घालणं हा त्या धर्माच्या पालनाचा 'आंतरिक' आवश्यक (एसेन्शियल) भाग आहे का नाही, या प्रश्नांची तड लावण्यात वेळ घालवत राहायचा ?

कायद्याच्या क्षेत्रातील गोष्टी

कायद्याच्या क्षेत्रात असं दिसून आलं की, हिजाब-बंदीच्या कृतीने मोठेच प्रश्न निर्माण झाले - हिजाबवर बंदी घालून धार्मिक आचरण करण्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणली गेली वा नाही ? शिक्षण घेण्याच्या स्वातंत्र्यावर गदा आली वा नाही ? आपल्या निवडीचा पोशाख घालण्याच्या स्वातंत्र्यावर निर्बंध आले वा नाही ? एकंदर गेल्या काही वर्षांचा अनुभव लक्षात घेता यासंबंधीच्या याचिका न्यायालयांमध्ये दीर्घ काळ प्रलंबित राहण्याचीच शक्यता अधिक. आणि त्या तशा प्रलंबित ठेवायच्या वा त्याची तड लावायची वा नाही याची सूत्रं याचिकाकर्त्यांऐवजी राजकीय प्रस्थापित वर्गाच्याच हाती राहण्याची शक्यता अधिक. उत्तर प्रदेश मधील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या वादाला तोंड फोडले गेले, असंही म्हटलं जातं.

त्यामुळे अशाही गोष्टी प्रत्यक्ष वादापेक्षा महत्त्वाच्या ठरतात!

ताज्या वृत्तांनुसार, 'हिजाब'चा वाद निर्माण करून आता तो आवाक्याबाहेर जायची लक्षणं दिसू लागल्यावर आणि उत्तर प्रदेशच्या निवडणूकीत वारे उलटे फिरू लागल्याचं जाणवताच भाजपच्या नेत्यांच्या वर्तनात गोंधळ दिसू लागला आहे. कर्नाटकच्या 'भाजप'च्या सरकारमधील नेहमी खूप 'बोलके' असलेले नेते व मंत्री संबंधित मंत्रालयावर जबाबदारी टाकून या वादापासून स्वत:ला दूर ठेवू पाहत असल्याचं चित्र आहे. यात सर्व काही आलं!

कायद्याचाच विचार करायचा तर 'त्रिवार तलाक'च्या बाबतीत काय झाल ते लक्षात घेण जरुरीच आहे. ती पद्धत अनिष्ट होती यात संशय नाही. त्या विरुद्ध कायदा झाला हेसुद्धा एक वेळ ठीक परंतु, मुस्लिमांबाबत तीव्र पूर्वग्रह असलेल्या केंद्र सरकारने त्या कायद्यात अशी कृती करणाऱ्या पतीला 'अपराधी' मानून त्याच्या कृतीला गुन्हेगारी स्वरूप दिलं. लग्नाच्या नात्याचं अपराधीकरण करण्याला पुरोगामी घटकाने विरोध केला, पण तो पुरेसा पडला नाही. 'लव्ह जिहाद' सारखे कायदे काही राज्यात केले गेले; त्यालाही पुरोगाम्यांनी विरोध केला, पण तोही पुरेसा पडला नाही. यावरून पुरोगाम्यांनी हिजाब वा अन्य कृतक 'सुधारणां'चा सीमित विचार करून भागणार नाही. अशा गोष्टींना आळा घालण्यासाठी व्यापक राजनीतीची आणि रणनीतीची गरज आहे.

कारण, बहुसंख्यांकवादी सत्ताधारी केवळ हिजाबावर बंदी घालून थांबणार नाहीयेत... सत्तेवर आहेत तोवर अशा अनेक गोष्टी ते सातत्याने करत राहणार हे गेल्या सात वर्षातील त्यांच्या 'कारवायां'वरून स्पष्टच दिसून आलेलं आहे. 'हिजाब-बंदी' घोषित करणंही त्यांच्या दृष्टीने मोठी 'सुधारणावादी' गोष्ट नसून तो त्यांच्या मुस्लिम नागरिकांना सतत दुय्यम ठरवून त्यांच्यावर 'अपराधी' 'गुंडे' दहशतवादी' असे 'ठप्पे' मारणं (उत्तर प्रदेशमधील प्रचार भाषणात आणखी काय होत आहे?) हे सर्व एका मोठ्या अजेंड्याचा भाग आहे, हे स्पष्टच दिसून येतं. त्यामुळे, व्यापक विचार करण्याऐवजी केवळ 'हिजाब योग्य की अयोग्य' यापुरती सीमित वादात उतरणं, म्हणजे बंदीला सामोऱ्या जाणाऱ्या मुलींनी आणि पुरोगाम्यांनीही प्रस्थापितांनी लावलेल्या सापळ्यात आपसूकच फसणं असाच त्याचा अर्थ होतो.

विद्वेषी घटनाक्रम आणि दोष-रेषांचा गैरफायदा

अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाला काही ना काही क्लुप्त्या (खोड्याच म्हणा) काढून दुय्यम नागरिक म्हणून हिणवत राहाणं, त्यांच्यावर 'वचक' बसवणं हा त्यांचा अजेंडा असल्याचं गेली सात वर्ष सातत्याने दिसून आलं आहे – 'लव-जिहाद', गोमांस-बंदी, 'घरवापसी' असं करत करत झुंड-बळीच्या हिंस्र मार्गाकडे ते वळले; भर करोना काळात तबलीगी जमातीला गोदी-मिडियाच्या साहाय्याने लक्ष्य बनवणं, 'सीएए-एनआरसी' कायद्याद्वारे त्यांना 'वेगळे' काढण्याचा, त्यांच्या नागरिक म्हणून ओळखीवरच घाला घालण्याचा प्रयत्न करणं आणि त्या कायद्यांविरोधात मुस्लिम स्त्रिया मोठ्या प्रमाणावर आंदोलनात उतरल्यावर व त्या आंदोलनाला मोठा प्रतिसाद लाभू लागल्यावर 'बनावट' दंगे निर्माण करून अनेकांना खोट्या प्रकरणांमध्ये गोवून आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न करणं (अर्थात आंदोलन थांबण्याचं करोना-ग्रस्ती हेसुद्धा प्रमुख कारण होतंच), 'गोली मारो सालोंको' अशा उघड धमक्या नेत्यांनी देणं; उत्तर प्रदेशमध्ये त्या आंदोलनात भाग घेणाऱ्याच्या संपतीवर टांच आणणं; धर्मांतर-विरोधी कायदा करून त्यांच्यावर 'वचक' बसवण्याचा प्रयत्न करणं; आणि असं सर्व करत असताना तडकाफडकी 'ट्रिपल तलाक'विरोधी कायदा आणून मुस्लीम महिलांचा उद्धार करण्याचा अभिनिवेश करणं आणि त्यानंतर, उत्तर प्रदेशच्या निवडणूक प्रचाराच्या दरम्यान 'अब्बाजान', '८०-बीस', 'गरमी कम कर देंगे' अशा शब्दावलीचा तेथील मुख्यमंत्र्यांनी 'हसतमुखाने वापर करणं आणि नंतर तथाकथित 'धर्मसंसदे'त मुस्लिमांचा 'नरसंहार' करण्याचं आवाहन करणं - अशा सर्व घटनाक्रमातून हे सर्व बहुसंख्याकवादी विद्वेषी राजकारणाचाच भाग आहे, हे स्पष्टच दिसून येतं... आणि आता 'हिजाब बंदी'सुद्धा त्याच शृंखलेतील आणखी एक गोष्ट आहे. त्यांच्या प्रस्तावित संहितेत आणखी अशा गोष्टी दडल्या असतील हे सांगण्यासाठी कुणा तज्ज्ञाची आवश्यकता नाही.

अनेक जाती, असंख्य पोटजाती; अनेक पंथ, आगळेवेगळे उपपंथ; अनेक संप्रदाय, धर्म आणि त्यांच्या पोटात अनेक समूह - इतक्या वैविध्यासह आणि त्याचप्रमाणे अंतर्विरोधांसह शेकडो वर्षं या देशातील लोक एकत्र राहात आहेत. असा इतिहास असल्यानेच परस्परांच्या चालीरितींबद्दल सहिष्णू कसं राहावं, याचीसुद्धा लोकांना जाणीव असल्याचं व्यापक स्तरावर दिसून आलेलं आहे. आणि अंतर्विरोध राहणं, दोष-रेषा राहाणं हेसुद्धा स्वाभाविक. मात्र त्या दोष-रेषांचा फायदा समाजाला विभाजित करून राजकारण साधण्याऱ्यांना घेऊ न देणं, इतकंच खरं तर सुजाण जनतेच्या हाती आहे!

champanerkar.milind@gmail.com

टिप्पणी

चार धाम परियोजनेसाठीच्या पॅनलचे मुख्य रवी चोप्रा यांचा राजीनामा

मीनल उत्तुरकर

केंद्र सरकारच्या बहुचर्चित चारधाम परियोजनेवर निरीक्षक म्हणून सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या उच्च स्तरीय समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध पर्यावरणवादी रवी चोप्रा यांनी निराश होऊन समितीच्या अध्यक्ष पदाचा आणि समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. राजीनामा देताना त्यांनी आपल्या पत्रात हिमालयातील पर्यावरणाच्या नाजुक स्थितीकडे आणि त्यामुळे पुढे संभावित असलेल्या नैसर्गिक आपत्तींकडे सर्वांनी केलेल्या दुर्लक्षाबद्दल निराश वाटल्याचे लिहिले आहे.

२०१६ मध्ये केंद्र सरकारच्या रस्ते परिवहन आणि हायवे मंत्रालयाने हिमालयातील उत्तराखंडमधील केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री आणि जमनोत्री या चार धाम यात्रास्थळांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम हाती घेतले. या प्रकल्पामुळे हिमालयासारख्या पर्यावरणीय दृष्ट्या नाजुक क्षेत्रावर विपरीत परिणाम होईल म्हणून या विरुद्ध एका स्वयंसेवी संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यावर, एकूण ९०० किलोमीटर विस्तार असलेल्या आणि १२००० कोटी रुपये बजेटच्या या परियोजनेच्या कामावर निरीक्षण ठेवण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने २०१९ मध्ये एक उच्च स्तरीय समिती स्थापन केली. सुप्रसिद्ध पर्यावरणवादी रवी चोप्रा यांची या समितीच्या प्रमुखपदी नियुक्ती केली. हा विभाग सीमेच्या जवळ येत असल्याने, या समितीची मुख्य कार्यकक्षा यात्रेकरूंच्या आणि सैन्याच्या हालचालींच्या दृष्टीने या रस्त्यांची रुंदी किती वाढवावी की हिमालयाच्या उताराला आणि पर्यावरणाला घातक ठरणार नाही, याचा अभ्यास करणे, ही होती.

रवी चोप्रा आपल्या राजीनामा पत्रात लिहितात, २०१३ ला झालेल्या केदारनाथ प्रलयाच्या वेळी त्यांनी त्याच्या कारणमिमांसेबद्दल तपशीलवार अहवाल सर्वोच्च न्यायालयाला सादर केला होता आणि हिमालयाच्या नाजुक संवेदनशील पर्यावरणाबद्दल उहापोह केला होता. त्यामुळे जेव्हा २०१९ साली चारधाम परियोजनेवरील समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांना निवडले गेले तेव्हा त्यांच्या प्रिय हिमालयाला संरक्षित करण्याची सुसंधी प्राप्त झाली आहे असे वाटलं म्हणून त्यांनी या पदाचा स्वीकार केला. समितीने मेहनतीने अभ्यास करून सर्वोच्च न्यायालयाला अहवाल सादर केला. हा अहवाल स्वीकारताना, दि. ८ सप्टेंबर २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की या अहवालातील रस्त्याच्या ५.५ मिटर रुंदीच्या तरतुदी परियोजनेत स्वीकारण्याने हिमालयावर होणारे घातक परिणाम रोखले जातील आणि यात्रेकरू आणि सैन्य सर्वांना याचा उपयोग होईल. पण नंतर संरक्षण मंत्रालयाने मागणी केली की या रस्त्यांची रुंदी ७ मिटर केल्याने जड संरक्षण वाहने जाण्यास मदत होईल. हे म्हणणे स्वीकारून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने दि. १४ डिसेंबर २०२१ रोजी रवी चोप्रांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेली मेहनत मान्य करूनही त्यांनी प्रस्तावित केलेल्या तरतुदी बाजूला सारून संरक्षण मंत्रालयाने केलेली मागणी स्वीकारली आणि रस्त्यांच्या ५.५ मिटर पुढील रुंदीकरणाला मान्यता दिली. त्याच बरोबर त्यांनी आदेश दिले की यापुढे रवी चोप्रांच्या समितीने फक्त दोन प्रवासी रस्त्यांच्या बांधकामाकडे लक्ष ठेवावे आणि बाकी संरक्षण खात्यासाठी महत्वाच्या असलेल्या रस्त्यांच्या बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी नवी समिती नियुक्त केली. या समितीच्या अध्यक्षपदी निवृत्त न्यायाधीश ए.के. सिक्री यांची नियुक्ती करण्यात आली. अशाप्रकारे हिमालयाच्या संवेदनशील आणि नाजुक अशा पर्यावरणाच्या समस्येकडे कानाडोळा करण्याची मूभा रस्ते बांधकामासाठी देण्यात आली. या गोष्टीने व्यथित आणि निराश होऊन जेष्ठ पर्यावरणवादी रवी चोप्रा यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

ते आपल्या राजीनाम्याच्या पत्रात पुढे म्हणतात, 'हिमालय हा निसर्गाचा अद्‌भुत चमत्कार आहे. सुप्रसिद्ध इतिहासकार

टोयनबी १९२९ मध्ये जेव्हा हिमालयाच्या शिखरांवरून विमानाने गेला तेव्हा ती चकमकती बर्फाच्छादित शिखरं बघून स्तिमित झाला आणि त्याने लिहिलं, या बर्फ शिखरांच्या वैभवातून जो प्रकाश तळपतो तो निसर्गाच्याही वरचा असा आध्यात्मिक आहे आणि तीच खरी वास्तवता असून त्याचे अस्तित्व मान्य केले नाही तर हिमालयही राहणार नाही आणि मानवही. कारण मानव हा इतर निर्जीव गोष्टींप्रमाणे निसर्गाचा भाग आहे आणि आपलं अस्तित्व हे या निसर्गामुळेच आहे.' चोप्रा पुढे लिहितात, हिमालयामध्ये जो विकास होतो आहे तो हिमालयाच्या या आध्यात्मिक वृत्तीचा मान ठेवून व्हायला हवा. शाश्वत विकास हा भौगोलिक दृष्ट्या आणि पर्यावरण दृष्ट्या संतुलित असायला हवा. असा विकास हा नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यास समर्थ असतो विशेषत: जेव्हा सद्या हवामान बदलामुळे पर्वतांच्या उतारांच्या स्थिरतेचा अंदाज बांधणे आव्हानात्मक होते आहे. पण मी बघतो आहे की आता विकासाच्या नावाखाली रस्ते बांधताना पर्वतांवर आणि जंगलांवर निष्ठूरपणे आधुनिक हत्यारे चालवली जात आहेत. अशा प्रकारे निसर्गावर मात केल्याचे फोटो समाज माध्यमांवर फिरवले जात आहेत. पण हे करताना ते विसरतात की मानव पण याच निसर्गाचा भाग आहे आणि हा निसर्ग नष्ट झाला तर मानवही नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. निसर्ग मात्र त्याच्यावरील अत्याचार विसरत नाही आणि माफही करत नाही. हिमालयात गेल्या काही वर्षात सतत कोसळणाऱ्या दरडी, येणारे महापूर आणि त्यांनी झालेला विनाशी संहार हेच सिद्ध करत आहे. दरडी कोसळल्यामुळे झालेला रस्त्यांचा विध्वंस भरून काढायला कित्येक महीने लागतात. २०१३ आणि २०२१ मध्ये निसर्गाने धोक्याच्या इशाऱ्याची घंटा वाजवली आहे. आपण कधी शहाणे होणार ?

शेवटी ते लिहितात, अध्यक्षपदाचा स्वीकार करताना मनात आशा होती की गेली ४० वर्ष हिमालयीन पर्यावरणाच्या जतनासाठी आणि संवर्धनासाठी करत असलेले प्रयत्न या समितीतर्फे फळाला येतील. पण माझा आतला आवाज मला सांगतोय की हे शक्य दिसत नाही. म्हणून मी अत्यंत निराश मनाने माझा राजिनामा देतो आहे.

meenal16@gmail.com

(टिप्पणी : पान ८ वरून)

आहेत ते सर्व लोक लक्षात ठेवणार आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत जेव्हा गांधीजींची फेरफार केलेली प्रतिमा आपल्यासमोर मांडतात तेव्हा त्यातून हेच सिद्ध होतं की गांधीजी अधिकच श्रेष्ठ झालेले आहेत. अन्यथा गांधीजींच्या खुन्याला पुजणाऱ्या लोकांना गांधीजी किंवा त्यांचे निकटतम साथीदार सरदार पटेल यांच्या चरणाशी वारंवार का यावं लागतं ? महात्मा गांधी आणि सरदार पटेल हिंदू होते हे ठसवण्याचा ते प्रयत्न करत राहतात.

जगभरात गांधीजींना इतकी मान्यता आहे कारण एका विशिष्ट धर्मावर आस्था असूनही त्यांनी इतर सर्व धर्मांना सन्मान दिलेला होता. त्यांच्या आश्रमात होणाऱ्या सर्वधर्म प्रार्थनेत प्रत्येक धर्मासाठी स्थान होतं. आश्रमात ज्या धर्माची व्यक्ती येत असे त्या धर्माच्या प्रार्थनेचा अंतर्भाव सकाळ-संध्याकाळच्या प्रार्थनेत केला जात असे.

सत्ता बदलली की आदर्श बदलू शकतात परंतु पुतळ्यांची तोडफोड करून अथवा कुणाचा अपमान करून परंपरागत मूल्यांमध्ये फेरफार करायला जाणं योग्य नाही. ३० जानेवारी २०२० ला दिल्लीमध्ये देशभरातील भगिनी एकत्र येऊन रस्त्यावर उतरलेल्या होत्या. कुणी काळ्या बुरख्यात, कुणी सलवार-कमीजमध्ये तर कुणी साड्या नेसलेल्या. सगळ्याजणी एकजूट होत्या. हातात तिरंगा घेऊन रस्त्या-रस्त्यात, चौका-चौकात शांतपणे उभ्या होत्या. या महिलांवर हल्ले झाले, असभ्य भाषेत टीकाही झाली. परंतु त्या सर्वशक्तीनिशी उभ्या होत्या. अशा सर्व ठिकाणी धोतर नेसलेले, काठी घेतलेले गांधीजी उभे होते. आपलं काम आजही सुरु आहे, आपण दिलेला सत्याग्रहाचा मार्ग लोक आजही अवलंबत आहेत हे पाहून त्यांच्या डोळ्यांत आनंद दिसत होता.

इथूनच तर खरी शक्ती मिळते. गांधीजी आयुष्यभर आपल्या मूल्यांसाठी झगडले आणि त्यासाठी त्यांनी प्राणही दिले. दरवेळी त्यांचा पुतळा तोडल्यानं, त्यांच्यावर टीका केल्यानं, त्यांच्या खुन्यांची भलावण करण्यानं गांधीजी अधिकच श्रेष्ठ होत जातात आणि आपल्याला आठवण करून देतात की त्यांनी दाखवलेल्या मार्गावर आपल्याला अधिक सजगपणे चालायचं आहे.

bhaivimal@gmail.com

अनुवाद : ऋजुता खरे

kharerujuta@gmail.com

भाष्य

कर्जबुडवे उद्योगपती आणि शेतकरी कर्जमाफी

सुभाष वारे

२०१५ च्या उन्हाळ्यात एके दिवशी आम्ही काही कार्यकर्ते बीड शहरात मुक्कामी होतो. सकाळी वर्तमानपत्रात बातमी वाचली की गेवराई तालुक्यातील तांदळा गावातील एका शेतकऱ्याने काल आत्महत्या केली होती. त्याच दिवशी आम्ही वेळ काढून तांदळा गावी गेलो आणि संबंधित शेतकऱ्याच्या कुटुंबियांना भेटलो. माहिती घेतली. त्या शेतकरी कुटुंबावर स्टेट बँक ऑफ इंडियाचं सोळा हजार रुपयांचं कर्ज होतं. हप्ते थकल्याने बँकेने नोटीस पाठवली. दुष्काळ आणि गारपिटीच्या आलटून पालटून होत असलेल्या माऱ्यानं कर्ज फेडणं शक्य नव्हतं. कुटुंबप्रमुखाला झोप लागत नसेल. नैराश्याच्या एका क्षणी त्यांनी आत्महत्या केली. अशी आत्महत्या करणारे ते एकटे नव्हते. आजही नाहीत. शेतकरी आत्महत्येचा प्रश्न त्याआधीही गंभीर होताच. आजही आहे. पुढे आम्ही काही कार्यकर्त्यांनी विदर्भ आणि मराठवाड्यात पंधरा दिवसांची शेतकरी संवाद यात्रा आयोजित करुन शेतकरी आत्महत्या झालेल्या अनेक कुटुंबाना भेटी दिल्या. संवाद केला. माहिती जमवली. कुणी बत्तीस हजार तर कुणी सत्तेचाळीस हजाराच्या कर्जापायी मरण जवळ केले होते. शेतकरी आत्महत्येची कारणे शोधायचाही प्रयत्न केला. मग पंचवीस जिल्ह्यात एकाच दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढून शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन आणि निवेदनासोबतच फाशीचा दोर जिल्हाधिकाऱ्यांना भेट देण्याचे आंदोलन केले.

आज हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे, गुजरातमधील एबीजी शिपयार्ड कंपनीने २८ बँकांना एकूण बावीस हजार आठशे कोटी रुपयांना गंडा घातल्याबद्दल त्याच स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने तक्रार दाखल केल्याची बातमी वाचली. या प्रकरणाचा तपास सीबीआयने सुरू केला आहे. सध्या दररोज नवनवीन घोटाळ्यांचा तपास सीबीआय हातात घेतेय. थोडे दिवस त्याच्या बातम्या होतात. पुन्हा नवा घोटाळा समोर आला की जुन्या घोटाळ्याच्या बातम्या थांबतात. जुन्या प्रकरणांची पुरेशी चर्चा करायलाही वेळ मिळू नये या वेगाने नवे घोटाळे समोर येत रहातात. विजय मल्ल्या, निरव मोदी, मेहूल चोक्सी... मालिका सुरु रहाते. बडे उद्योगपती राष्ट्रीयकृत बँकांचे कर्ज थकीत ठेवून बुडवतात हा विषय युपीए सरकारच्या काळातही आम्ही उठवत होतोच. जागतिकीकरण विरोधी कृती समितीच्या माध्यमातून सुरु असलेल्या अनेक आंदोलनात हा विषय मांडला जायचा. युपीएच्या काळापासून राष्ट्रीयकृत बँकांची थकित कर्जे (एनपीए) वाढत वाढत आज एनडीएच्या काळात जवळपास दहा लाख कोटी रुपयांपर्यंत वाढली आहेत. दीर्घकाळ थकित कर्जे राहिली की बँकांचा ऑडिट रिपोर्ट खराब दिसतो. नकारात्मक शेरे येतात. म्हणून मग आधी काही काळ मार्च महिनाअखेर नवंजुनं करुन ऑडिट रिपोर्ट स्वच्छ दिसेल अशी व्यवस्था होते. नवंजुनं करणं म्हणजे मार्चअखेर फक्त जुनं कर्ज फेडण्यासाठी नवं कर्ज मंजूर करायच. याने थकबाकी तशीच रहाते फक्त कर्जाला नव्या तारखांचं झबलं चढवलं जातं. किंवा दुसरा मार्ग म्हणजे ऑडिटच्या भाषेत ही थकित कर्जे निर्लेखित केली जातात म्हणजे राईट ऑफ केली जातात. राईट ऑफ करणे म्हणजे वसुली करण्यास अवघड असलेली कर्जे ताळेबंदात एका पानावरुन दुसऱ्या पानावर लपवणे. ताळेबंदातील एनपीएचं पान स्वच्छ दिसतं पण थकित कर्ज ताळेबंदाच्या दुसऱ्या पानावर तसच पडून असत. मागील दहा वर्षात ११.६८ लाख कोटी रुपये तर मागील सात वर्षात १०.७ लाख कोटी रुपये थकित कर्जे बँकांनी निर्लेखित म्हणजे राईट ऑफ केल्याची बातमी डिसेंबर २०२१ मधे इंडियन एक्स्प्रेस या दैनिकाने दिली होती. नरेंद्र मोदी सरकारच्या काळात बँकांनी निर्लेखित केलेल्या जवळपास दहा लाख कोटी रुपये थकित कर्जापैकी फक्त एक लाख कोटी रुपये वसुल होऊ शकले आहेत असे माहिती अधिकार कार्यकर्ते विवेक वेलणकर यांचे म्हणणे आहे.

इथे प्रश्न असा आहे की, शेतकरी वा सामान्य मध्यमवर्गीय माणसांच्या कर्जाचे तीन हप्ते थकल्याबरोबर पहिली नोटीस पाठवून जप्तीची पुढील कार्यवाही सुरु होते तर मग अशा हजारो कोटी

रुपये कर्जाच्या बाबतीत संबंधित बँक अधिकारी काय झोपलेले असतात काय ? अर्थात राजकीय पाठबळाशिवाय असे घोटाळे होऊच शकत नाहीत. आत्यंतिक नफ्याच्या प्रेरणेमुळे भांडवलशाही घातक ठरते तर ज्याला इंग्रजीत क्रोनी कॅपिटॅलिज्म म्हणतात अशी ही मर्जीतल्या उद्योगपतींच्या देशबुडव्या कारवायाकडे दुर्लक्ष करायला लावणारी हितसंबंधी भांडवलशाही अजून जास्त घातक ठरते.

राष्ट्रीयकृत बँकांमधे ठेव स्वरुपात ठेवलेला बहुतांशी पैसा हा मध्यमवर्गीयांचा असतो. त्यावर कर्जबुडव्या उद्योगपतींनी डल्ला मारल्यावर या बँकांना पुन्हा आर्थिक ताकद देण्यासाठी केंद्र सरकारने रिजर्व्ह बँकेचा राखीव निधी वापरला, तो पैसाही सरकारचा म्हणजेच जनतेचा. एबीजी शिपयार्ड प्रकरणात, कंपनीने घेतलेले कर्ज अन्य कारणांसाठी वळवले का ? याचा तपास करत आहेत. मनी लॉंड्रींगचा मुद्दाही तपासला जातोय. अशी गंभीर आर्थिक बेशिस्त केवळ भ्रष्ट राजकीय नेते आणि भ्रष्ट वरिष्ठ सरकारी अधिकारी यांच्या संगनमतामुळेच होऊ शकते. खाजगी क्षेत्राच्या कार्यक्षमतेचा व गुणवत्तेचा उदो उदो करणाऱ्यांनी याबाबतही कधीतरी बोलले पाहिजे.

शेतकरी कर्जमाफीचा विषय पुढे आला की, कर्ज माफ करणे हे अर्थव्यवस्थेच्या निकोप वाढीसाठी कसे घातक असते हा गदारोळ भांडवली माध्यमे सुरु करतात. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एका माजी महिला प्रमुखाने पण शेतकरी कर्जमाफीला विरोध करताना आर्थिक शिस्तीचे आपले ज्ञान पाजळले होते. शेतीसाठी घेतलेली कर्जे त्याच कारणासाठी खर्च केली जावीत हा आग्रह योग्यच आहे पण मग कर्जबुडव्या उद्योगपतींच्या प्रकरणात का सर्वांची आळीमिळी गुपचिळी असते. निर्णयप्रक्रियेतील वरिष्ठ अधिकारी आणि माध्यमांचा शेतकरी कर्जमाफीबाबतचा हा विलाप इतका परिणामकारक असतो की त्यामुळे बँकांनी शेती व्यवसायासाठी कर्जपुरवठा कमी कमी करत आणला आहे. कागदोपत्री शेतीसाठी म्हणून दिलेला जो कर्जपुरवठा दिसतो त्यातीलही बराचसा भाग हा शहरी भागात शेतीच्या नावाने उभारलेल्या शीतगृह किंवा तत्सम उपक्रमांसाठी दिलेले कर्ज असते. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले आणि बँकांना शेतीसाठी विशिष्ट प्रमाणात कर्जपुरवठा करण्याचे बंधन कायद्याने घालण्यात आले. आता तर याच सरकारी बँकांचे पुन्हा खाजगीकरण करण्याची पावले सरकारने उचलली आहेत. सध्याच जवळपास पंच्याहत्तर टक्के शेतकरी शेतीसाठीच्या कर्जाकरिता खाजगी सावकारीवर अवलंबून आहेत. खाजगीकरणानंतर हे चित्र आणखी निराशाजनक होईल.

२०१४ साली नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर आले तेव्हा त्यांनी जनतेला दिलेल्या अनेक आश्वासनांपैकी पारदर्शी व स्वच्छ प्रशासन हे ही एक आश्वासन होते. पारदर्शी व स्वच्छ प्रशासनाची दोन अंगे असतात. एक म्हणजे, सामान्य नागरिक जेव्हा आपल्या छोट्या-मोठ्या कामासाठी शासकीय कार्यालयात जातात तेव्हा त्यांची कामे हेलपाटे घालावे न लागता, वेळेत व्हावीत आणि त्यासाठी जे नियमित शुल्क असेल त्यापेक्षा अधिकची चिरीमिरी कुणालाही द्यावी लागू नये. आणि दुसरे म्हणजे सत्तेच्या वर्तुळाशी संपर्क राखून असलेल्या धनदांडग्यांच्या बेशिस्त कारभार आणि भ्रष्ट आचरणा विरोधात कडक पावले वेळीच उचलली जातात. या दोन्ही आघाड्यावर आज निराशा दिसतेय. सामान्य नागरिकांना दररोज छळणाऱ्या महागाई, बेरोजगारीसारख्या प्रश्नांची मुळे ही अकार्यक्षम, अपारदर्शी, उत्तरदायीत्वहीन आणि भ्रष्ट प्रशासनातच लपलेली आहेत.

ware.subhash@yahoo.in

पंतप्रधान केअर फंडच्या हिशोबात विसंगती !

सार्वजनिक आचरणात पै न पैचा हिशोब महत्वाचा असतो. देशाच्या सर्वोच्च पदावरुन जनतेच्या हितासाठी, जन सामान्यांच्या अडी-अडचणीत कामी यावा म्हणून, अनेकविध मार्गाने देणग्या गोळा करुन चालवण्यात येणाऱ्या**पीएम केअर फंड**बाबत प्रथमपासूनच अनेक वाद-प्रवाद आहेत. त्यात आता अजून एकाची भर ! या फंडाचा अधिकृत, ऑडीट झालेला आणि वेबसाईट वर प्रसिद्ध झालेला २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा हिशोब आणि या संदर्भात सरकारकडून वेळोवेळी प्रकाशित झालेली अधिकृत माहिती, याच्यात विसंगती आढळून आल्याचे उघड झाले आहे. www.moneylife.in वर या संदर्भात सविस्तर लेख प्रसिद्ध झालेला आहे. जिज्ञासुंनी तो मुळातून अवश्य पहावा.

दखल

महिला आणि ट्रान्सजेंडर ठेवताहेत पारादिप बेट स्वच्छ! सर्वसमावेशक सामाजिक आर्थिक परिवर्तनाचे उत्तम उदाहरण!!

सिरत सातपुते

आपण सगळे पारादिपला ओरिसाच्या किनारपट्टीवरील बंदर शहर म्हणून ओळखतो. स्वच्छ आणि सोनेरी किनारे आणि नैसर्गिक खाड्या असलेले पारादिप हे सुंदर शहर. पण या वैशिष्ट्यांव्यतिरिक्त पारादीपचे आणखी एक वेगळेपण आहे. पारादिप हे भारतातील सर्वात स्वच्छ छोट्या शहरांपैकी एक आहे. हो, ओरिसातील पारादिप हे छोटेसे शहर हे देशातील सर्वात स्वच्छ शहरांपैकी एक आहे आणि हे शक्य झालेय ते ओरिसातील महिला आणि ट्रान्सजेंडर्सच्या बचतगटांमुळे...

काय आहे पारादीपच्या स्वच्छतेचं रहस्य? ८०हजार लोकसंख्या असलेल्या पारादीपवासियांनी हे कसं साध्य केलं असेल? स्वच्छतेचे हे पारादिप मॉडेल अद्वितीय आहे कारण यात महिला, ट्रान्सजेंडर समुदाय आणि कचरावेचकांना कचरा व्यवस्थापन व्यवस्थेमध्ये सामावून घेण्यात पारादीप नगरपालिकेला यश आले आहे. पारादिप नगरपालिकेने कचरा व्यवस्थापनाचे एक सामाजिक-आर्थिक मॉडेल तयार केले आहे जे केवळ उपेक्षितांनाच एकत्रित करत नाही तर स्वत:ला स्वयंपूर्ण बनवण्यासाठी पुरेसा महसूल देखील निर्माण करते. महिला बचतगट, ट्रान्सजेंडर समुदायाचे बचतगट व कचरावेचकांना एकत्रित करुन शहरातील कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याचे पारादिप नगरपालिकेने ठरवले आणि पारादिप स्वच्छ होत गेले.

पण २०१९ पूर्वी कसं होतं पारादिप शहर? शहरातील रस्ते, नाले आणि मोकळ्या जागा कचऱ्याने भरल्या होत्या. कारण पारादिपमध्ये २०१९ पूर्वी घनकचरा व्यवस्थापनाची कमतरता होती. कचरा गोळा करतानाच कचरा वेगवेगळा केला जात नव्हता, घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याची पद्धत अनियमित होती, लोक त्यांच्या घरातील कचरा सामुदायिक डब्यात टाकत होते. थोडक्यात बहुतांशी शहरांसारखीच ही परिस्थिती होती.

परंतु २०१९ मध्ये पारादिप नगरपालिकेने निर्णय घेतला की आता बदलाची वेळ आली आहे. त्यांनी शहरातील कचरा व्यवस्थापन व्यवस्थेत तात्काळ आणि मोठे बदल घडवून आणले. नगरपालिकेने सामाजिक-आर्थिक शाश्वततेवर आधारित मॉडेल सादर केले. महिला बचतगट, कचरावेचक आणि ट्रान्सजेंडर समुदाय यांना कचरा व्यवस्थापनात सामावून घेत त्यांना आर्थिक आणि सामाजिक शाश्वती दिली आणि आतापर्यंत उपेक्षित असलेला हा वर्ग स्वच्छ पारादिपच्या प्रयत्नांतील एक महत्वाचा हिस्सा बनला.

कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी शहरातील प्रत्येक घरी जाऊन जनजागृती करण्याची जबाबदारी पालिकेने बचत गटांना दिली. ही जनजागृती मोहीम मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली. कचरा गोळा करणाऱ्यांकडे कचरा सुपूर्द करण्यापूर्वी लोकांनी सुका कचरा ओला कचऱ्यापासून वेगळा करण्यास सुरुवात केली.

कचरा व्यवस्थापनाची पहिली पायरी म्हणजे घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे. हे काम पारादिप नगरपालिकेद्वारे बचत गटांच्या मदतीने चालवले जाते. स्थानिक भाषेत स्वच्छ कर्मी म्हणून ओळखले जाणारे कचरा गोळा करणारे दररोज सकाळी घरोघरी जाऊन कचरा गोळा करतात. स्वच्छ कर्मींची देखरेख एका पर्यवेक्षकाद्वारे केली जाते ज्याला स्वच्छ साथी म्हणतात. स्वच्छ साथी आणि स्वच्छ कर्मी या सर्व महिला बचत गटांच्या सदस्य आहेत. प्रत्येक स्वच्छ साथीला साधारण ६०० घरे नेमून दिलेली असतात. दररोज सकाळी सहा वाजल्यापासून अकरा वाजेपर्यंत स्वच्छकर्मी कचरा गोळा करतात. लोकांना कचरा व्यवस्थापनाबद्दल माहिती देणे, कचरा वेगवेगळा देण्यासाठी उद्युक्त करणे, स्वच्छकर्मींच्या कामावर देखरेख करणे व हा कचरा प्रोसेसिंग युनिटमधे जमा करण्याचे काम हे स्वच्छ साथी करतात. बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांच्या मदतीने कचरा गोळा केला जातो. पर्यावरण पूरक असलेल्या ह्या गाड्याही बचत

गटांच्या महिला ड्रायव्हर चालवतात.

अशाप्रकारे गोळा केलेला कचरा मग जवळच्या कचरा प्रक्रिया केंद्रात खत तयार करण्यासाठी आणला जातो. या केंद्राला वेल्थ सेंटर असेही म्हणतात. देशात अनेक ठिकाणी अशा प्रकारचे कचऱ्यापासून खत बनवण्याचे प्रकल्प आहेत. पण मग पारादिप मॉडेलच वैशिष्ट्य काय ? पारादिप मॉडेलमध्ये कचऱ्याच्या या खत प्रकल्पात ट्रान्सजेंडर समुदायातील लोक काम करतात. या समुदायाचे बचत गट तयार करुन त्यांच्या सदस्यांना घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात पारादिप नगरपालिकेने सामावून घेतले आहे. ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्याच्या प्रक्रियेत काम करणाऱ्या या समुदायाचे जीवनमान उंचावल्यामुळे हा समुदाय मनापासून हे काम करतो आणि त्यातून तयार होणारे खत नगरपालिकेला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व्हायला मदत करतं.

ट्रान्सजेंडर समुदायाचं अशा प्रकारच्या प्रकल्पात बचत गटाच्या माध्यमातून सामिल होणं हे खरोखरंच अद्वितिय आहे. हे मॉडेल या समुदायाला कामाची हमी तर देतच आहे पण त्याहूनही जास्त महत्वाचं म्हणजे आत्मसन्मानाने जगण्याची संधी देत आहे. केवळ विशिष्ट समुदायाचे असल्याने कामाची संधी नाकारलेले जेव्हा अशा प्रकारच्या मॉडेलचे घटक बनतात तेव्हा ते मॉडेल यशस्वी तर होतेच त्याचबरोबर त्या समुदायाला मुख्य प्रवाहात येण्यासाठी दरवाजाही उघडते.

या प्रकल्पात गेले एक वर्ष काम करणाऱ्या फुला रानी किन्नर सांगतात, 'गोळा झालेला कचरा बारीक करणे, त्यात आवश्यक घटक मिसळणे, ते उन्हात वाळवणे, तयार खत भरणे ही कामं मी करते. सकाळी ७ ते २ या वेळेत केलेल्या या कामाचे मला ९ हजार महिना मिळतात. मी खूष आहे कारण मला मागायला जावे लागत नाही. आम्हा ट्रान्सजेंडर समुदायाला अशा प्रकारे घनकचरा व्यवस्थापनात सामावून घेतल्याबद्दल मी सरकारचे आभार मानते.'

तयार झालेले खत म्हणजेच 'मो खाता' हे मो खाता विक्री केंद्रांतून विक्रीला ठेवले जाते. पारादिप नगरपालिकेने शहरात अशी अनेक विक्री केंद्र उघडली आहेत. २०रुपये किलोने विकले जाणारे हे खत नागरिक आवर्जून विकत घेतात. या विक्री केंद्रातही बचत गटातील महिलांना रोजगार दिला जातो. यातून त्यांचा घरखर्च व मुलांचे शिक्षण होते आहे. या महिलाही या खताची माहीती देत असताना कचरा व्यवस्थापनाची माहितीही देत असतात. हीसुध्दा एकप्रकारची जनजागृतीच आहे.

गोळा झालेला सुका कचरा हा मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटीत (MRF) आणला जातो जिथे त्याचे पुनर्वापर करण्यायोग्य व पुनर्वापर करण्यायोग्य नाही असे वर्गीकरण करण्यात येते. पुनर्वापर करण्यायोग्य प्लास्टीक कचरा धुवून वाळवून बारीक करुन दाण्यांत रुपांतरीत करण्यात येतो व नवीन वस्तू बनवण्यासाठी कारखान्यांना विकला जातो.

पारादिप प्रशासनाचे प्राधान्य कचरामुक्त, प्लॅस्टीकमुक्त पारादिप हे आहे. त्यांना कचऱ्याच्या भरावाच्या जागा बंद करायच्या आहेत. पारादिप अधिकाधिक हरित करायचं आहे. पारादिप जरी छोटं शहर असलं तरी त्यांच्या कचरा व्यवस्थापनाच्या कल्पना खूप मोठ्या आहेत. पायाभूत सुविधांतील बदल हे नागरिकांच्या परिणामकारक सहभागाशिवाय कधीच यशस्वी होत नाहीत. पारादिपमधे हे शक्य झालंय. पारादिपमधील कचरा व्यवस्थापनात ट्रान्सजेंडर समुदायाचा समावेश हा समाजातील प्रत्येक घटक महत्वाचा आहे हे अधोरेखित करते. सर्वसमावेशक सामाजिक आर्थिक परिवर्तनाचे हे उत्तम उदाहरण आहे. हे यशस्वी उदाहरण देशात अन्यत्रही राबवले जावे यासाठी आग्रह धरला पाहिजे. स्वच्छ भारत अभियान हे नुसते अभियानापुरते न राहता त्यायोगे सर्वसमावेशक सामाजिक आर्थिक परिवर्तन व्हावे यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

satputesirat@gmail.com

टपालाने अंक वेळेवर मिळत नाही ?

काही वाचकांना आंदोलन अंक टपालाने वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी अधून मधून येत असतात. सर्व वर्गणीदारांच्या पत्त्यावर अंक दरमहा १ तारखेला पोस्ट केला जातो. साधारणत: ५ ते १० तारखेपर्यंत अंक मिळायला हवा. अंक न मिळाल्यास स्थानिक पोस्टात चौकशी करा. वेळ पडल्यास तक्रार करा. आंदोलन कार्यालयास कळवा.

- व्यवस्थापक

चर्चा

भविष्याकडे परत फिरूया–जागतिक तापमानवाढ, फॅसिझमचा फास आणि मान्सूनचा उतारा - भाग २

सुनील तांबे

जागतिकीकरणानंतरचा फॅसिझम

वस्तू, सेवा आणि भांडवल यांचा जगामध्ये अनिर्बंध संचार म्हणजे जागतिकीकरण. या व्यवस्थेत एक देश मोटार कार्सचं उत्पादन करेल तर एक देश केवळ कंप्युटर्सचं उत्पादन करेल, काही देश गहू पिकवतील तर काही देशांत तांदळाचं पीक घेतलं जाईल. कोणताही देश आपल्या मूलभूत गरजांबाबत स्वयंपूर्ण वा आत्मनिर्भर असणार नाही. थायलंडमध्ये तांदळाचं विक्रमी उत्पादन होत असेल, अमेरिका वा ऑस्ट्रेलियामध्ये गव्हाचं प्रचंड उत्पादन होत असेल, मलेशियात पामतेलाचं प्रचंड उत्पादन होत असेल तर भारताने ही पिकं घेऊ नयेत. या देशांकडून या उत्पादनांची आयात करावी. त्यावरील आयात शुल्क रद्द करावं वा नाममात्र ठेवावं जेणेकरून भारतातील ग्राहकांना ही उत्पादनं स्वस्तात उपलब्ध होतील, असा दावा जागतिकीकरणाचे समर्थक करतात.

अत्याधुनिक तंत्रज्ञान–विशेषत: माहिती-तंत्रज्ञान, जैव-तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता इत्यादीचा विकास, वित्त भांडवलशाहीमुळे शक्य झाला. आता बाजारपेठ जागतिक बनली. संपत्तीच्या निर्मितीत कित्येक पटींनी वाढ झाली. त्यामुळे राष्ट्र-राज्याची चौकट अडचणीची ठरू लागली. भांडवल, वस्तू आणि सेवा यांच्या चलनवलनावरचे राष्ट्र-राज्यांचे निर्बंध दूर करणं ही वित्त भांडवलाची, नव्या तंत्रज्ञानाची गरज होती. या प्रक्रियेलाच जागतिकीकरण वा ग्लोबलायझेशन म्हणतात. त्यामुळे आयात-निर्यात मुक्त झाली. एखाद्या उत्पादनाच्या आयातीवर निर्बंध घालायचे तर त्याची संयुक्तिक कारणं जागतिक व्यापार संघटनेपुढे मांडणं प्रत्येक राष्ट्र-राज्याला सक्तीचं ठरलं. आयात शुल्क किती आकारायचं ह्यासंबंधातही आंतरराष्ट्रीय कायदेकानून आहेत. त्यासंबंधात विवाद निर्माण झाल्यास त्यांच्या सोडवणुकीच्या व्यवस्थाही आहेत (त्या कितपत कार्यक्षम आहेत हा वेगळा विषय आहे).

जागतिकीकरणाला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशी दोन अंगं आहेत. राष्ट्रीय पातळीवर मुक्त बाजारपेठ, खाजगीकरण आणि करांमध्ये कपात वा सुलभीकरण (वन नेशन-वन टॅक्स वा जीएसटी) ही मूल्यं स्वीकारणं, आंतरराष्ट्रीय पातळीवर मुक्त व्यापार आणि जकातीमध्ये (आयात शुल्क) कपात यांचा स्वीकार करणं. हे अंमलात आणायचं तर प्रत्येक देशात कायद्याचं राज्य हवं, मुक्त निवडणुका हव्यात आणि अल्पसंख्यांकांच्या हक्कांना मान्यता मिळायला हवी. कारण तरच मुक्त बाजारपेठ वा मुक्त व्यापार शक्य आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व देशांचे परस्पर संबंध शांततापूर्ण असायला हवेत, जागतिक व्यापार संघटनेचे कायदे-कानून सर्व देशांनी पाळावेत हे अभिप्रेत आहे. प्रत्येक व्यक्तीला निवडीचं स्वातंत्र्य हवं, लिंगभाव समता हवी, विविधतेचा स्वीकार करायला हवा आणि स्थलांतर सुलभ व्हावं या बाबीही जागतिकीकरणात येतात.

या सर्व बाबी एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. मुक्त बाजारपेठेसाठी मुक्त निवडणुका गरजेच्या आहेत कारण लोकशाही नसेल तर बाजारपेठ बेगडी भांडवलदार आणि सरकारी भ्रष्टाचार यांच्या आहारी जाईल. अर्थव्यवस्थेचं जागतिकीकरण आणि ग्राहकाचं स्वातंत्र्य हातात हात घालून असतं. देशातील ३ ब्रॅण्डसमधून निवड करायची की जगातल्या १०० ब्रॅण्डसमधून? हा ग्राहकाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आहे.

परंतु २००८ सालच्या मंदीनंतर प्रत्येक देश आप-आपल्या संरक्षणासाठी पुढे सरसावला. डोनाल्ड ट्रंम्प यांना अमेरिकेत बाजारपेठ मुक्त हवी होती. परंतु मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराला त्यांचा विरोध होता. अमेरिकन बाजारपेठेत कोणत्या देशाच्या वस्तू याव्यात हे ठरविण्यासाठी बहुपक्षीय सहकार्याचे करार व मुक्त व्यापार यांना बगल द्यायला हवी असं त्यांचं मत आहे. याउलट चीनचा मुक्त व्यापाराला पाठिंबा आहे.

पण चीनला मुक्त निवडणुका नको आहेत. कारण चीन नावचं राष्ट्र-राज्यच त्यामुळे कोसळून पडण्याची भीती चीनला वाटते.

चीन हे राष्ट्र-राज्य नाही तर सभ्यताधिष्ठीत राज्य आहे अशी मांडणी केली जाते. ही सभ्यता अर्थातच चीनची आहे. त्यामुळे चिनी सभ्यतेच्या पचनी पडेल, चिनी सभ्यतेचा विकास होईल तीच सार्वत्रिक (युनिव्हर्सल) मूल्यं आम्ही स्वीकारू अशी त्यांची भूमिका आहे. त्यामुळे लोकशाही, मानवी हक्क इत्यादी पाश्चात्य मूल्यं आमच्यावर लादण्याचं कारण नाही, असं कम्युनिस्ट चीनचं म्हणणं आहे. प्राचीन चीन साम्राज्याचं पुनरुज्जीवन म्हणजे चीनला जगाच्या केंद्रस्थानी आणणं हे चिनी कम्युनिस्ट पक्षाचं उद्दीष्ट आहे. त्यासाठी पाश्चात्य औद्योगिक राष्ट्रांनी एक शतक चीनची जी अवहेलना केली, छळ व शोषण केलं त्याचा बदला घेतला पाहीजे, या सूत्राभोवती चीनचं राष्ट्रीय व परराष्ट्रीय धोरण आखण्यात आलं. शैक्षणिक धोरणातही अवहेलनेच्या शतकाला मध्यवर्ती स्थान आहे. चीनचं हे साम्राज्य हान वंशीयांचं आहे. शिंगजियान प्रांतातील उघ्यूर मुस्लिम, तिबेटमधील बौद्ध आणि अन्य बिगर-हान समूहांनी त्यांचं अस्तित्व हान वंशीयांमध्ये विसर्जित करावं, हाँगकाँगमधील तरुणांनी लोकशाहीची, व्यक्तीस्वातंत्र्याची मागणी सोडून द्यावी, स्वत:ला चीन नावाच्या महान राष्ट्रवादी समूहात विलीन करावं, तैवानने बऱ्याबोलानं चीनमध्ये सामील व्हावं अन्यथा युद्धाला तयार राहावं, अशी कम्युनिस्ट चीनची अधिकृत भूमिका आहे.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे संपत्तीच्या निर्मितीत प्रचंड वाढ झाली आहे, विषमता वाढली आहे, जागतिक तापमान वाढ होते आहे, पर्यावरणाचा विनाश होतो आहे. मात्र प्रत्येक देश या समस्यांसाठी आपल्या देशातील एका समूहाला लक्ष्य करतो आहे आणि राष्ट्राबाहेरील एक शत्रू शोधतो आहे. त्यासाठी भूतकाळातील सुवर्णयुगाचं गाजर बहुसंख्यांकांपुढे धरतो आहे. डोनाल्ड ट्रम्पच्या समर्थकांना वाटतं की अमेरिका श्वेत वर्णीयांची आहे आणि पूर्वीप्रमाणे हा देश जगाची महाशक्ती बनला पाहिजे. अमेरिकेतील श्वेत वर्णीयांच्या नोकऱ्या व रोजगार दक्षिण अमेरिकेतील तपकीरी रंगाचे निर्वासित, आफ्रिकन-अमेरिकन इत्यादी हिरावून घेत आहेत, चिनी वस्तूंनी अमेरिकेची बाजारपेठ काबीज केली आहे. जागतिक तापमानवाढीला रोखण्याच्या पॅरीस करारातून बाहेर पडण्याचा निर्णय डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतला होता. कारण अमेरिकेच्या उत्पादनात वाढ करायची तर पॅरीस करारामुळे येणारी बंधनं झुगारायला हवीत अशी त्यांची भूमिका होती. ट्रम्प समर्थकांनी तर अमेरिकन काँग्रेसवर हल्ला केला होता. अमेरिकेत लोकशाही संस्था भक्कम आहेत, तिथे गोदी मिडिया नाही. मात्र आजही अमेरिकन सरकार ट्रम्पवर कारवाई करायला धजावत नाही.

तुर्कस्तान हा देश एकेकाळी सेक्युलर राष्ट्र-राज्य होता. परंतु २०१४ पासून या देशालाही ऑटोमान साम्राज्याच्या पुनरुज्जीवनाची स्वप्नं पडू लागली आहेत. या आक्रमक राष्ट्रवादाने केवळ इस्लामचं पुनरुज्जीवन केलेलं नाही तर कुर्दीश समूहाला चिरडण्याचं धोरण स्वीकारलं आहे. हे कुर्दीश धर्माने मुसलमानच आहेत. युरोपियन युनियन, अमेरिका यांच्या विरोधात तुर्की राष्ट्रवाद उफाळून आला आहे. तुर्कीची वाटचाल फॅसिझमच्या दिशेने होते आहे असा निर्वाळा वॉशिंग्टन पोस्ट, द वायर अशा अनेक प्रसारमाध्यमांनी दिला आहे.

युरोपातही राष्ट्रवादाचा ज्वर वाढला आहे. स्थलांतरीत, निर्वासित यांच्या विरोधात जनमानस तापलं आहे. उदारमतवाद तिथे रुजलेला असला तरिही युरोपियन संस्कृतीत हे स्थलांतरित, विस्थापित, निर्वासित विलीन होऊ शकणार नाहीत अशी जाहीर भूमिका मांडली जाते. फ्रान्स असो वा जर्मनी वा लोकशाहीचा पाळणा हलवणारं इंग्लड सर्व देशांमध्ये आक्रमक राष्ट्रवाद्यांनी आतले आणि बाहेरचे अशी विभागणी करायला सुरुवात केलीय आणि त्यांना मतदारांचा पाठिंबाही मिळतो आहे. झारच्या आणि कम्युनिस्ट राजवटीतील विशाल रशियन साम्राज्याचं स्वप्न पुतीन पाहात आहेत. विरोधकांना ते राष्ट्रद्रोही म्हणतात.

भारत केवळ कागदोपत्री सेक्युलर आहे. राजकीय शक्तींनी मशीद पाडण्याचा गुन्हा केल्याचा निष्कर्ष काढताना, सर्वोच्च न्यायालयाने मशीदीच्या जागेवर राम मंदिर उभारण्याचा निर्णय दिला. गोरक्षकांनी धुमाकूळ घातला आहे. झुंडीच्या बळींमध्ये मुसलमानांची संख्या सर्वाधिक आहे. मुसलमानांच्या विरोधात शस्त्रं उचलण्याचं आवाहन धर्मसंसदेत जाहीरपणे

केलं जातं. भारतीयस्वातंत्र्य आंदोलनाचं नेतृत्व करणारा पक्ष आणि नेते राष्ट्रद्रोही असल्याचं जाहीरपणे सांगितलं जातंय. भारतीय मुसलमानांकडे आर्थिक शक्ती नाही, शिक्षण नाही, व्यापारामध्ये त्यांचा वरचष्मा नाही की सरकारी वा खाजगी नोकऱ्या त्यांनी बळकावलेल्या नाहीत. तरीही ते आपले शत्रू आहेत असा प्रचार हिंदुत्ववादी करतात. मुसलमानांपाठोपाठ ख्रिश्चनांना लक्ष्य केलं जात आहे.

विश्वगुरु भारत या संकल्पनेची टिंगल-टवाळी पुरोगामी, डावे आणि आंबेडकरवादी प्रच्छन्नपणे करतात. एखादा रविश कुमारसारखा पत्रकार या संकल्पनेचा पोकळपणा वारंवार निदर्शनास आणतो. ही बाब स्वागतार्ह आहे आणि दिलासा देणारी आहे. मात्र विश्वगुरु भारत ही संघ परिवाराची सोची-समझी रणनीती आहे. त्यामागे अनेक व्यक्ती व संघटनांची शक्ती पद्धतशीरपणे उभी केली जात आहे याकडे आपण दुर्लक्ष करतो.

दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले की महाशक्ती बनण्याची भारताला गरज नाही. भारताने विश्व गुरु बनण्याची आकांक्षा ठेवायला हवी. चारित्र्य निर्माणासाठी जगाने भारताकडे यावं आणि या लोकांची हृदयं आपण जिंकून घ्यायला हवीत. जगातील महाशक्ती केवळ त्यांच्या हितसंबंधांचं राजकारण करत आहेत, मात्र जगात समतोल साधण्यासाठी विश्वगुरुची भूमिका केवळ भारतच निभावू शकतो, असं त्यांनी ठामपणे मांडलं. उपराष्ट्रपती, वेंकय्या नायडू, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह अनेक नेत्यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालीच भारत विश्वगुरु बनू शकतो हे आग्रहाने मांडलं आहे. अर्थशास्त्र, आर्यभटीय, पतंजलीचं योगशास्त्र, चरक आणि सुश्रुत संहिता, वेद आणि उपनिषदं असा ज्ञानाचा महान ठेवा भारताकडे होता म्हणून कोणे एकेकाळी भारताकडे विश्वगुरु म्हणून पाहिलं जायचं. हा वारसा वृद्धिंगत करण्याची आणि जगात आपली द्वाही फिरवण्याची वेळ आलेली आहे, असं संघ परिवाराचं म्हणणं आहे. प्राचीन भारतीय विमानविद्या, भारतीय गाईच्या दूध, तूप, मूत आणि शेणातील औषधी गुण, आयुर्वेदातील शस्त्रक्रिया विशेषत: प्लास्टिक सर्जरी इत्यादी, योगशास्त्र आणि वेद-उपनिषदांतील मनोविज्ञान यांच्या पायावर भारताने स्वदेशी विज्ञानाची उभारणी करायला हवी, हे स्वदेशी विज्ञान जगाला मार्गदर्शक ठरेल, अशी संघ परिवाराची धारणा आहे.

ए. जी. नुरानी या विचारवंतांच्या मते विश्वगुरु संकल्पना ही दूरगामी राजकीय कार्यक्रमाची नांदी आहे. राजकीय विरोधकांना नष्ट करणं, आपल्या विरोधातील आवाजाचा कायमचा बंदोबस्त करणं, सेक्युलॅरिझम मोडीत काढणं, लष्करी शक्तीचा उपयोग करणं आणि जगातील विविध फॅसिस्ट शक्तींचा पाठिंबा मिळवणं, सारांशाने सांगायचं तर देशात हिंदुत्वाची द्वाही फिरवणं आणि जगातून या विचाराला संमती मिळवणं हा कार्यक्रम या संकल्पनेमध्ये अनुस्यूत आहे असं ए. जी. नुरानी यांनी त्यांच्या निबंधात म्हटलं आहे.

संघ परिवारातील सर्व संस्था, संघटना विश्वगुरु भारत या राजकारणासाठी सज्ज झाल्या आहेत. रघुनाथ माशेलकर, अनिल काकोडकर यांच्यासारखे देशातील बिनीचे शास्त्रज्ञ त्यांना सामील झाले आहेत. संगणकतज्ज्ञ, विजय भटकर हेही त्यांच्यासोबत आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदु महासभा यांनी इटलीतील फॅसिस्टांकडून प्रेरणा घेतली आणि भारतीय फॅसिझमची उभारणी करायला सुरुवात केली. यासंबंधात मार्जियाना कॅसरोली या इटालियन अभ्यासिकेने केलेली मांडणी जिज्ञासूंनी अवश्य वाचावी. अमेरिका, युरोपियन युनियन, चीन, तुर्कस्तान, भारत यांच्या राजकारणात फॅसिझमच्या विविध रंगच्छटा आहेत आणि त्यांना जनाधारही आहे.

सावरकर, गोळवलकर यांच्या विचारांना २१ व्या शतकात प्रतिसाद का मिळतो आहे?

युरोपीय देश भारतात आले त्यावेळी भारताची अर्थव्यवस्था ही जगातील दोन क्रमांकाची अर्थव्यवस्था होती. ब्रिटीशपूर्व भारतात उत्पादकता प्रचंड होती, पक्क्या मालाची निर्यात भारत आणि चीन हे दोनच देश करत होते. ही उत्पादन व्यवस्था हाताळणारे कारागीर, व्यवस्थापक, बँकर्स, वाहतूक-दार विविध धर्मांचे व जातींचे होते. काही उद्योगधंद्यांवर विशिष्ट

जाती वा धर्मीयांचं वर्चस्वही होतं. परंतु एवढी मोठी अर्थव्यवस्था चालविण्यासाठी समाजातील विविध समूहांमध्ये सहकार्य व विश्वास असावा लागतो तो अर्थातच होता. विविध राज्यांमध्ये संघर्ष, युद्ध, चकमकी नित्याच्या असूनही अर्थव्यवस्था चालवण्यासाठी आवश्यक असाणारं सहकार्य व संवाद होता. या बाबी युरोपियनांसाठी नवीन होत्या. त्यांच्या राष्ट्राच्या व्याखेत न बसणाऱ्या होत्या. ब्रिटिशांच्या राजवटीत भारतातील औद्योगीक संस्कृतीला ओहोटी लागली. ब्रिटिशांच्या धोरणांमुळे भारत कच्च्या मालाची निर्यात करणारा देश बनला. इंग्लडमधील कारखान्यांची हक्काची बाजारपेठ बनला. साम्राज्यवादाच्या या लुटीचा सिद्धांत दादाभाई नवरोजी यांनी मांडला आणि भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचा पाया घातला. त्याच आधारावर इंडियन नॅशनल कॉंग्रेस स्थापन झाली होती. एक राष्ट्र-एक धर्म-एक संस्कृती या पाश्चात्य कल्पनेला कॉंग्रेसने नकार दिला. या देशाचे रहिवासी मग ते कोणत्याही धर्माचे, वंशाचे, जातीचे, भाषांचे असले तरीही भारतीय आहेत अशी सुस्पष्ट भूमिका कॉंग्रेसने तिच्या स्थापनेपासून घेतली. कॉंग्रेसला शह देण्यासाठी ब्रिटिशांनी मुस्लिम लीग जन्माला घातली. साडेपाचशे संस्थानांचं अस्तित्व ठेवलं, धर्मनिहाय स्वतंत्र मतदारसंघांची रचना केली, जातनिहाय मतदारसंघ निर्माण केले. ब्रिटिशांच्या या रणनीतीचा यशस्वी मुकाबला गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीने केला. केंब्रिज विद्यापीठाचे अर्थशास्त्री, एंगस मॅडिसन यांनी केलेल्या अभ्यासानुसार १७०० सालात भारतीय अर्थव्यवस्थेचा जगातला हिस्सा २२.६ टक्के होता. १९५२ साली संपूर्ण युरोपचा जगाच्या अर्थव्यवस्थेतला वाटा २३.३ टक्के होता आणि भारताचा केवळ ३.८ टक्के. यावरून ब्रिटिशांनी भारताची केवढी प्रचंड लूट केली हे स्पष्ट होतं. साहजिकच या सर्व काळात भारतीय जनमानस साम्राज्यशाहीच्या विरोधात होतं. स्वराज्य मिळालं, स्वातंत्र्य मिळालं तरच आपली आर्थिक परिस्थिती सुधारू शकते हे लोकांना कळत होतं. १९२१ साली भारताची लोकसंख्या ३१ कोटी होती आणि शहरी लोकसंख्या केवळ १० टक्के होती. १९६० साली भारताची लोकसंख्या ४५ कोटी होती आणि शहरी लोकसंख्या २० टक्के होती.

जिस देश में गंगा बहती है हा चित्रपट १९६० साली प्रदर्शित झाला. गुन्हेगार जाती-जमातींना मुख्य प्रवाहात आणण्याचं आशयसूत्र असलेल्या या चित्रपटात स्वातंत्र्य आंदोलनातील राष्ट्रवादाचा आदर्श सार्थपणे प्रतिबिंबित झाला आहे.

''ज्यादा की नहीं लालच हमको, थोडे मे गुजारा होता है,'' या ओळींमध्ये गीतकार शैलेंद्रने भारतीय राष्ट्रवाद आपल्या आंतरिक बळावर उभा होता, हे अधोरेखित केलंय.

''कुछ लोग जो ज्यादा जानते हैं, इन्सान को कम पहचानते हैं,
ये पूरब है, पूरबवाले हर जान की कीमत जानते हैं,
मिल जुल के रहो और प्यार करो,
एक चीज यही जो रहती है,''

या ओळी पश्चिमी राष्ट्रवादाचा उद्घोष करणाऱ्यांना म्हणजे हिंदुत्ववादी, मुस्लिम लीगला उद्देशून आहेत. कारण पुढच्या कडव्यात शैलेंद्र सांगतो ''जो जिससे मिला सिखा हमने, गैरों को भी अपनाया हमने, मतलब के लिये अन्धे होकर, रोटी को नही पूजा हमने''. या चित्रपटाने १९६० साली २ कोटी रुपये कमावले आणि त्याशिवाय अनेक पुरस्कारही मिळवले. कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आंदोलन बहुसंख्य भारतीयांच्या आकांक्षांना संबोधित करत होतं. ऐंशीच्या दशकापर्यंत हा प्रभाव टिकून होता. म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदु महासभा यांना जनाधार मिळाला नाही. १९८० साली स्थापन झालेल्या भारतीय जनता पक्षाला तोंडदेखल्या का होईना गांधीवादी समाजवादाचा स्वीकार करणं भाग पडलं.

१९४७ साली भारताची लोकसंख्या होती ३४ कोटी आणि साक्षरता केवळ १२ टक्के होती. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा निम्माहून अधिक होता. २०१८ साली देशाची लोकसंख्या १४० कोटी होती आणि साक्षरतेचं प्रमाण ७४.३७ टक्क्यांपर्यंत वाढलं. १९४७ साली देशाचं सकल राष्ट्रीय उत्पादन केवळ २.७ लाख कोटी रुपये होतं. देशाची ५० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असली तरिही शेती क्षेत्राचा (यामध्ये पशुपालन, मासेमारी, ऊस, चहा, कॉफीचे मळे यांचाही समावेश होतो) सकल राष्ट्रीय उत्पादनातला वाटा केवळ ११-१२ टक्के आहे.

२०१८ साली देशाचं सकल राष्ट्रीय उत्पादन १४७.७९ लाख कोटी रुपये होतं. आज भारताची अर्थव्यवस्था जगामध्ये पाचव्या क्रमांकाची आहे. देश गरीब होता तेव्हा हिंदुत्ववादी, फॅसिस्ट यांचा जनाधार केवळ ब्राह्मण आणि उच्चवर्णीयांपुरता मर्यादीत होता. देशाच्या आर्थिक प्रगतीसोबत हिंदुत्ववाद्यांची, फॅसिस्टांची शक्ती वाढताना दिसते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ साली झाली. विश्व हिंदू परिषदेची स्थापना १९५० च्या दशकात झाली. मात्र २१ व्या शतकात या शक्ती स्वबळावर सत्तेत आल्या. १९७० सालापर्यंत काऊ बेल्ट वा गायपट्टा हिंदी भाषक राज्यांपुरता होता. १९९० नंतर गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांचाही गायपट्ट्यात समावेश झाला आहे.

औद्योगीकरणामुळे संपत्तीत वाढ झाली, समाजाच्या एकजिनसीकरणाला गती मिळाली. मुंबई, दिल्ली, कोलकता, बंगलोर, चेन्नई, जयपूर, गुवाहाटी वा अन्य कोणत्याही शहरात तुम्हाला उत्तुंग टॉवर्स आणि मॉल्स दिसतात. केंटुकी फ्राईड चिकन, मॅकडोनाल्ड, कॅफे कॉफी डे, बारिस्ता या चेन असतात. ब्रॅण्डेड कपड्याच्या दुकानांच्या चेन्स सर्व शहरांमध्ये आहेत. त्याशिवाय अमेझॉन आणि फ्लीप कार्ट आहेच. प्रत्येक शहराचा तोंडावळा सारखा बनतो आहे. धर्म, कर्मकांडं, विधी यांचंही एकजिनसीकरण होत आहे. कोणत्याही जातीच्या विवाह समारंभांवर हिंदी सिनेमांचा प्रभाव दिसतो. केशभूषा, वेषभूषा, रंगभूषा, नाच-गाणी, बुफे, जेवणाचे पदार्थ इत्यादींवर. एक-जिनसीकरण झालेल्या औद्योगिक समाजात, संस्कृतीचं उत्पादन सिनेमे, वेब सिरीज करतात. कारण संस्कृतीचीही बाजारपेठ तयार होते. व्यक्ती आणि समूह संस्कृतीची निर्मिती, जतन आणि संगोपन करण्याची शक्ती गमावून बसतात. समाजाचं असं एकजिनसीकरण होतं तेव्हा समाजाच्या आकांक्षा बदलतात. तरुण पिढीला एकजिनसीपणाचं आकर्षण आहे. कारण हे एकजिनसीकरण संपत्तीच्या निर्मितीशी, उपभोग्य वस्तूंच्या वैपुल्याशी संबंधीत आहे. तेच मानवजातीचं भविष्य आहे, अशी समाजाची साधार समजूत असते.

भारताचा जागतिक दृष्टिकोन, स्वातंत्र्य आंदोलनात विकसित झाला. साम्राज्यवादी शोषणाला विरोध, रशिया आणि अमेरिका या दोन महाशक्तींपासून अलिप्त राहून आपला विकास करण्याची संधी नवस्वतंत्र राष्ट्रांना मिळणं हा त्यांचा हक्क आहे ही भूमिका स्वातंत्र्यलढ्यात विकसित झाली होती. म्हणून नेहरूंनी अलिप्ततावादाच्या धोरणाची मुहूर्तमेढ रोवली. दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर, भारताने जगात शांतिदूताची भूमिका निभावायला हवी या भूमिकेची पाळंमुळंही भारतीय स्वातंत्र्यलढ्यात होती. सम्राट अशोकाची राजमुद्रा स्वीकारून, बौद्ध धर्मातील धम्मचक्राची राष्ट्रध्वजावर स्थापना करून आणि सत्यमेव जयते या बोधवाक्याचा स्वीकार करून नेहरूंनी या भूमिकेला भारतीय इतिहासातील सेक्युलर परंपरेशी जोडलं होतं. उत्पादन-वितरण-उपभोगाची केंद्रीय आणि विकेंद्रीत अशा दोन्ही व्यवस्थांचा मेळ घालता येतो, घालायला हवा ही बाबही स्वातंत्र्यलढ्यात मान्य झाली होती. खादी हे त्याचंच प्रतीक होतं. मात्र एकजिनसी समाजाच्या निर्मितीने वेग घेतल्यावर भारतातील मध्यमवर्गाला महाशक्ती बनण्याची स्वप्नं पडू लागली. त्या स्वप्नांना संबोधित करण्यासाठी विश्वगुरु भारत ही संकल्पना संघ परिवाराने पुढे आणली आहे.

शैलेंद्रच्या गाण्याचे साधे बोल–''ओठोंपे सच्चाई रहती है, जहाँ दिलमें सफाई रहती है'', भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील चारित्र्य या मूल्याकडे लक्ष वेधणारे होते. आधुनिक जीवनपद्धतीत, अर्थकारणात, राज्यकारभारात नेमकी त्याचीच उणिव आहे. अशा परिस्थितीत काय होणार ? जग विनाशाच्या उंबरठ्यावर आहे का ? कोलंबियाचा लेखक, गॅब्रिअल गार्सिया मार्खेजने नोबेल पुरस्कार स्वीकारताना आपल्या भाषणाच्या अखेरी म्हटलं होतं की मानवाचा अंत स्वीकारणं मी नाकारतो, ''समग्र मानवी काळात केवळ भयस्वप्न वाटू शकलं असतं ते भीषण वास्तव आज आपल्यासमोर उभं ठाकलं आहे. गोष्ट निर्माण करणारे आम्ही लेखक तर कशावरही विश्वास ठेवू शकतो. मग हाही विश्वास बाळगण्याचा आम्हाला हक्क आहे की, या भयावह युटोपियाच्या विरोधातला एक नवा युटोपिया निर्माण करण्याच्या कामाला लागण्यासाठी आम्हाला अजून उशीर झालेला नाही.'' (क्रमशः)

suniltambe07@gmail.com

आघाडीवर

सुंदरबनमधील विशालकाय अमलामेठी हिल रिसॉर्टबाबतचे राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरणाचे आदेश

राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरणाने (NGT - एनजीटी) पश्चिम बंगाल मधील सुंदरबन येथील अमलामेठी हिल रिसॉर्ट तोडण्याचे आदेश देताना, अधिकाऱ्यांच्या अवैध सावकारीबाबत निरीक्षण नोंदवले आहे. एनजीटीने अमलामेठी हिल रिसॉर्ट तोडण्याचे आणि नैसर्गिक पर्यावरण पुनर्संचयित करण्याचे आदेश दिले. पुनर्संचयन खर्चाचे थेट मूल्यांकन करुन उल्लंघनकर्त्यांकडून दंड वसुलीचे आदेशही एनजीटीने दिले. मनरेगा निधीतील पैसे अवैध सावकारी करुन खाजगी रिसॉर्ट विकसित करण्यासाठी वापरले, असे निरिक्षणही एनजीटीने नोंदवले.

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाशी संलग्न दक्षिणबंगा मत्स्यजीबी फोरम (DMF) ने राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (एनजीटी) मध्ये नोंदवलेली तक्रार आणि लिगल इनिशेटिव्ह फॉर फॉरेस्ट अँड एन्व्हायर्न्मेंट (LIFE) च्या मदतीने पाठपुरावा करण्यात आलेल्या खटल्यानेअनेक समस्यांना तोंड फोडले आहे.

२३ डिसेंबर २०२१रोजी दक्षिणबंगा मत्स्यजीबी फोरमने सुंदरबनमधील अमलामेठी येथील पर्यटन रिसॉर्टच्या बेकायदेशीर आणि पर्यावरणीय विनाशक बांधकामाच्या प्रकरणी दाखल केलेल्या एका गुन्ह्याच्या ऐतिहासिक निकालात राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने सर्व बांधकाम थांबवण्याचे आदेश दिले. एनजीटीने जिल्हा दंडाधिकारी अक्षम आणि बेजबाबदार असल्याची नोंद केली. पोलिस अधिकाऱ्यांना कारवाई करण्यास सांगितले आणि अहवाल देण्यासाठी मुख्य सचिवांना जबाबदार धरले. एनजीटीने पुढे जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या सेवा पुस्तकात त्यांची निरीक्षणे प्रविष्ट करण्याचे निर्देश दिले होते आणि एनजीटीकडे वैयक्तिकरित्या हजर राहून त्यांच्या चुका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते.

पुढे ६ जानेवारी २०२२ रोजी या प्रकरणातील दुसऱ्या आदेशात एनजीटीने प्रशासकीय अधिकाऱ्यांनी रिसॉर्ट बांधकाम तोडण्यासाठी आणि परिसराचे नैसर्गिक पर्यावरण पुनर्संचयित करण्यासाठी उचललेल्या पावलांना मान्यता देताना खालील निरीक्षणे नोंदवली.

१. जिल्हा दंडाधिकारी, दक्षिण २४ परगणा यांच्या अहवालानुसार जेव्हा पर्यावरण कायद्यांचे उल्लंघन करुन अमलामेठी हिल रिसॉर्ट बांधले जात होते तेव्हा अधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षक, बरुईपूर पोलीस स्टेशन यांना, प्रकल्प प्रवर्तकाविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचे कोणतेही निर्देश जारी केलेले नाहीत.

२. शासन प्रतिज्ञापत्र दि. ०५.०१.२०२२ सांगते की CRZ-I अंतर्गत येणाऱ्या अमलामेठी हिल रिसॉर्टमध्ये खारफुटीच्या लागवडीसाठी रु. १७, ३३, ४१७ (रुपये सतरा लाख तेहतीस हजार चारशे सतरा) मंजूर करण्यात आले आहेत. परंतु प्रकल्प प्रस्तावकांकडून दंडाची रक्कम निश्चित केली गेली का आणि वसूल केली गेली की नाही, हे प्रतिज्ञापत्रातून उघड होत नाही.

३. DMF च्या वतीने उपस्थित असलेले मान्यवर वकील श्री. रित्विक दत्ता यांनी या प्रकरणाचा कागदोपत्री संदर्भ दिला आहे की खाजगी रिसॉर्ट विकासकांवर आतापर्यंत ६५४.०९९ लाख रुपये खर्च केले गेले आहेत. खाजगी रिसॉर्ट विकासक/प्रस्तावक/प्रस्तावकांच्या आर्थिक वाढीसाठी 'मनरेगाचा' निधी, जो राज्याचा निधी आहे, कसा काय वापरला जाऊ शकतो असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

४. अवैध सावकारी प्रतिबंधक कायदा, २००२च्या कलम ३, ४ आणि कलम ४३ आणि ४४ आणि त्या अनुसूचीच्या परिच्छेद २५, २६ आणि २७ संयुक्तपणे असे दर्शवते की जर एखाद्या भागात हवा, पाणी, जमिन आणि पर्यावरणाचे प्रदूषण

(पान २६ वर)

आघाडीवर

कंत्राटी कामगारांचा कामाचा आणि उपजीविकेचा अधिकार कायम ठेवा!

१५ आणि १६ फेब्रुवारी २०२२ रोजी जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाशी संलग्न श्रमिक जनता संघ या कामगार संघटनेच्या अध्यक्ष मेधा पाटकर यांनी कोलकता येथे बीएसएनएल कामगारांच्या लढ्यात सामील होत, त्यांना सक्रीय पाठिंबा जाहीर केला. केंद्रीय कामगार मंत्रालय, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री आणि कलकत्ता टेलिफोन जिल्हा, बीएसएनएलचे मुख्य महाव्यवस्थापक यांना यावेळी खालील निवेदन देण्यात आले आणि त्यांना पश्चिम बंगालमधील बीएसएनएलच्या हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कामाचा आणि उपजीविकेचा अधिकार कायम ठेवण्याचे आवाहन करून, २०१९-२० पासूनची प्रलंबित देयके त्वरित वितरित करा आणि बीएसएनएल बचाओ समिती, संयुक्त कंत्राटी कामगारांची प्रतिनिधी संस्था यांच्याशी सल्लामसलत करून, सर्व कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेतले जाईल याची खात्री करा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी संबंधीत अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा झाल्याचे पाटकर यांनी सांगितले.

निवेदन

पश्चिम बंगालमधील अनेक जिल्ह्यांचा (अंशत: किंवा पूर्ण) समावेश असलेल्या बीएसएनएल कलकत्ता टेलिफोन डिस्ट्रिक्ट (CTD) च्या कंत्राटी कामगारांना न्याय मिळावा यासाठी आम्ही, पश्चिम बंगाल आणि संपूर्ण भारतातील चिंतित नागरिक आणि जनसंघटना कळकळीने हे पत्र लिहित आहोत. गेल्या अडीच वर्षांत हे कंत्राटी कामगार भयंकर परिस्थितीचा सामना करत आहेत आणि या प्रकरणात तुमचा तातडीचा हस्तक्षेप आवश्यक आहे.

मुख्य कर्मचारी म्हणून संयुक्त कंत्राटी कामगारांना कंत्राटदार किंवा CTD व्यवस्थापनाने कोणतीही सूचना न देता अचानक नोकरीतून काढून टाकले. आपणा सर्वांना माहित आहे की ते वीस-पंचवीस वर्षांपासून बीएसएनएलसोबत काम करत होते आणि बीएसएनएल दूरध्वनी सेवेच्या विस्तारात आणि परिपूर्णतेमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे रोजगार गेल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झालाय, ज्यामुळे त्यांना 'आत्महत्या' करण्यास भाग पाडले जात आहे.

दरम्यान, बीएसएनएलच्या विभागांनी, सेवानिवृत्तीचे वय ५५ वर्षे केल्याने अनेक कामगारांना ऑक्टोबर २०१९ पासून सेवा शर्तींमधील बदलाचा फटका सहन करावा लागला, ज्यामध्ये ESI फायदे बंद केले गेले. सर्वात अस्वीकार्य बाब आहे की मे आणि जून २०२० मधे जेव्हा लॉकडाऊन असूनही पूर्ण महिना (२६ दिवस) काम केले होते अशा किमान ४६०० संयुक्त कंत्राटी कामगारांना देखील पैसे दिले गेले नाहीत. बहुतेक बीएसएनएल एक्स्चेंजेसमध्ये देखील, संयुक्त कंत्राटी कामगारांना सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर २०१९ आणि जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च २०२० या महिन्यांसाठी २६ दिवसांसाठी वेतन दिले गेले नाही. (परंतु केवळ ८, किंवा जास्तीत जास्त १३ दिवसांसाठी वेतन दिले गेले). ही सर्व थकबाकी तत्काळ सर्व कामगारांना योग्य व्याजासह देण्यात यावी.

JCL सिस्टीम SLA (सर्विस लेवल ॲग्रीमेंट) मध्ये बदलण्याच्या दुर्दैवी निर्णयामुळे एकीकडे SLA मध्ये सामावून न घेतलेले सर्व साडेतीन हजार कंत्राटी कामगार बेरोजगार झाले आहेत आणि दुसरीकडे CTD ने संयुक्त कंत्राटी कामगारांचे अनुभवी योगदान गमावल्यामुळे कलकत्ता टेलिफोनच्या सेवेवर परिणाम झाला आहे. अविचारी खाजगीकरणामुळे, अब्जाधीश झालेल्या खाजगी कॉर्पोरेट्सना दिलेल्या बढावा आणि सवलतींमुळे, कर्मचारी आणि कामगारवर्ग वंचित आणि निराधार झाला आहे. याचे सार्वजनिक क्षेत्रावर कसे वाईट परिणाम होत आहेत ते पाहून आम्ही अत्यंत व्यथित आणि क्षुब्ध झालो आहोत.

म्हणून तुमच्या राज्यातील कामगारांच्या जगण्याच्या आणि उपजीविकेच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी केंद्रीय कामगार मंत्रालयाद्वारे केलेल्या चुकीला आव्हान देणारा हस्तक्षेप तुम्ही त्वरित करावा अशी आम्ही विनंती करतो. आम्ही अपेक्षा करतो की तुम्ही या कामगारांवर झालेल्या अन्यायाच्या पाठीशी

(पान २७ वर)

आघाडीवर

मध्यमवर्गीयांनी दलित-पीडितांच्या पाठीशी उभे रहाणे, हेच बंधुभावाचे प्रतीक !

उरणच्या वायू विद्युत केंद्राच्या ४० वा वर्धापन दिन व भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ह्याचे औचित्य साधून, विद्युत केंद्राच्या वसाहतीतील मनोरंजन केंद्रात दि. १४ फेब्रुवारी २०२२ रोजी सायंकाळी आदरणीय मेधा पाटकर व संजय मं. गो.यांचे व्याख्यान आयोजित केले होते. विषय होता ''भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी पर्वात, देशाप्रती आमची भूमिका''.

वसाहतीतील रहिवाशी हे मेधाताई व संजय मं. गो. आपल्यात येणार ह्या कल्पनेनेच भारावून गेले होते. ह्या वक्त्यांकडून देशाप्रती आमची भूमिका समजावून घेण्याअगोदर श्रोत्यांच्या मनाची योग्य तयारी होणं, हे सुद्धा अतिशय गरजेचं होतं. त्यासाठी 'सुंदर प्रांगण व आकर्षक वेशभूषा' ह्या स्पर्धेचं मुद्दामच आयोजन करण्यात आलं होतं. ह्या स्पर्धेला 'भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' ही थीम देण्यात आली होती. संपूर्ण वसाहतीतील उत्साह दोन दिवस अगोदर पासूनच बघायला मिळत होता. आमच्या विद्युत केंद्राच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित वेगवेगळ्या कार्यक्रमात व्यग्र असूनही सारे रहिवाशी आपापल्या इमारती समोरील प्रांगण स्वच्छ करण्यात व सजवण्यात दंग झाले होते. Valentine Day च्या दिवशी आपल्या देशाप्रतीचं प्रेम व्यक्त करण्याची संधी रहिवाशांना आयतीच चालून आली होती. त्यामुळे आबालवृद्धांसह तरुणाई सुद्धा ह्या प्रेमात आकंठ बुडालेली दिसत होती. सायंकाळी नियोजित वेळेत प्रत्येक जण पाहुण्यांच्या स्वागतासाठी आतुर झाला होता. सारे रहिवाशी सुशोभित केलेल्या आपापल्या इमारती समोर तिरंगा वेषात सज्ज झाले होते. पाहुण्यांना ह्या स्पर्धेची पूर्वकल्पना मुद्दाम देण्यात आली नव्हती. जसे पाहुणे व्याख्यानाला जाण्यासाठी बाहेर पडले इमारती समोरील भव्य रांगोळ्या आणि तिरंग्याच्या वेशभूषेत व तिरंगाकृती रचनेत उभ्या असलेल्या रहिवाशांनी त्यांचं अत्यंत उत्साहाने स्वागत केलं. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, विविधता में एकता अशा नानाविध रांगोळ्यांनी सजलेल्या इमारती मोहक दिसत होत्या. क्रांतिकारकांच्या, हुतात्म्यांच्या बलिदानाच्या आठवणी जाग्या करणारे देखावे एकीकडे प्रत्येकाच्या देशभक्तीचे चित्रण दाखवित असतानाच, लतादीदींच्या श्रध्दांजलीचे स्मारक सुद्धा ताईंना अभिवादन करण्यासाठी भावुक करत होते. ह्या सर्व सजावटीला सार्थ रूप देताना प्रत्येक इमारतीतील रहिवाशांनी परिधान केलेल्या वेशभूषा संपूर्ण भारताचे एकात्मतेचे दर्शन घडवित होत्या. त्यातही प्रत्येक ठिकाणी लहान मुलांनी आपापल्या सजावटीविषयी केलेले निवेदन देखाव्यांना सजीव रूप तर देत होतेच पण त्याचबरोबर आपल्या देशाचे भविष्य घडविणारे हे लहानगे देशाच्या इतिहासाबद्दल किती सजग आहेत, ऋणी आहेत ह्याची सुद्धा जाणीव करून देत होते. प्रत्येक इमारतीच्या रहिवाश्यांनी पाहुण्यांशी सहजपणे संवाद साधला. देखावे पाहत पाहत पुढे सरकत असताना सभागृहात पोहचेपर्यंत काफ़िला चांगलाच मोठा झाला होता.

वायू विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार यांनी प्रास्ताविक केल्यानंतर स्वातंत्र्ययाच्या अमृत महोत्सवी पर्वात आमची भूमिका विशद करताना संजय मं. गो. यांनी स्वातंत्र्याची सुरुवात आपल्या स्वत:पासून करण्याचा कानमंत्र देतांना आपल्या पत्नीला, घरातील स्त्रियांना, मुलांना स्वातंत्र्याच्या समतेची फळे चाखायला देण्याच्या गरजेवर भर दिला. आपण कोणत्याही जाती–धर्माचे असू, आपली बांधिलकी देशाच्या संविधानाशी हवी, हे सांगताना त्यांनी खरे धार्मिक आणि धर्माचा वापर आपसात दुही, द्वेष आणि हिंसा पसरवणारे अधार्मिक यांच्यातील फरक स्पष्ट केला. आपण अशा लबाड धर्मांध संधिसाधु लबाडांपासून दूर रहाण्याचा कानमंत्र त्यांनी सर्वांना दिला. तसेच, सकारात्मक पालकत्व ह्या अत्यंत गरजेच्या पैलूवर आपल्या स्वानुभवातून खूपच महत्वाचे मार्गदर्शन त्यांनी श्रोत्यांना केले. त्यातून पालकांना समज तर मिळालीच पण श्रोत्यांमध्ये उपस्थित असलेल्या लहान मुलांना सुद्धा प्रभावित केले. ह्याची लगेचच आलेली प्रचिती म्हणजे झोपेपर्यंत व सकाळी उठल्यापासून TV पाहणारी मुले TV न लावण्याची सूचना करू लागली. हा अनुभव वसाहतीतील अनेकांनी दुसऱ्या दिवशी आवर्जून सांगितला.

मेधा पाटकर यांनी आपल्या नेहमीच्या ओघवत्या शैलीत, देशाचे आजचे चित्र श्रोत्यांपुढे विशद केले. धार्मिक अराजकता किती विद्रुप स्वरूप धारण करीत आहे, ह्याचे उदाहरण देत देशाची एकात्मता, सहिष्णुता जपण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, ह्याचे भान सर्वांना करून दिले. देशातील शेतकरी, कामगार, विद्यार्थी

असे विविध घटक आज विविध प्रश्नांनी त्रस्त आहेत. लोकशाही व्यवस्थेत यासाठी आवाज उठवणे अत्यावश्यक आहे. उर्जेच्या क्षेत्रातही पर्यवरणाचे भान राखत उर्जेच्या पर्यायी स्त्रोतांबाबत जागरुकता निर्माण करणे गरजेचे आहे. माहितीचा अधिकार असो किंवा कामगारांना न्याय मिळणे असो, जन आंदोलने छेडल्याशिवाय प्रश्न सुटत नाही. अशावेळी मध्यमवर्गीयांनी दलित–पीडितांच्या पाठीशी उभे रहाणे हेच देशातील बंधुभावाचे प्रतीक असू शकेल, असे त्या शेवटी म्हणाल्या. यावेळी अनेकांनी नर्मदा घाटीतील महिलांनी रोजगार निर्मितीसाठी स्वत: बनवलेल्या वस्तुंची खरेदी केली आणि आंदोलन मासिकाचे वर्गणीदार झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका बुरुड यांनी केले.

दोन वेळा सुखाने जेवण करून आपले कुटुंब, घर, बंगला, Savings, Income tax ह्यांत विश्व सामावलेल्या समाजाचे देशाप्रती कर्तव्य हे फक्त गप्पांमधून व्यक्त होत रहाणे पुरेसे नाही. किंबहुना, राजकारणी आणि समाजसेवक ह्यांचीच ही जबाबदारी आहे, असा अनेकांचा समज झालेला असतो. परंतु, तरीही देशसेवेची, देशप्रेमाची एक सुप्त इच्छा जन सामान्यांच्या मनात कुठेतरी दडलेली असते. मेधाताई व संजय मं. गो. यांच्या येण्याने, रहिवाशांच्या मनातील हेच सुप्त देशप्रेमाचे स्फुल्लिंग चेतविले गेले. त्यांची ही देशप्रेमाची भावना सतत तेवत ठेवणे, जागृत ठेवणे, अत्यंत गरजेचे आहे. ह्यासाठी विविध कार्यक्रमांतून, उपक्रमांतून त्यांना जोडून घेऊन त्यांची ही ऊर्जा सकारात्मकतेकडे वळविणे, उपयुक्त ठरेल. आज सामाजिक चळवळीत कार्यकर्त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवते. सर्वच नागरिक क्रांतिकारकांचा आक्रमक मार्ग स्वीकारायला धजत नाहीत. पण प्रत्येकाला काहीतरी करण्याची इच्छा नक्कीच असते. त्यामुळेच प्रत्येकाला सहभागी होता येईल, असा कार्यक्रम गांधीजींनी असहकार, परदेशी मालाचा बहिष्कार, खादीचा वापर अशा विविध मार्गाने दिला व स्वातंत्र्याची चळवळ घराघरांत पोहोचली. असाच प्रयत्न आताही व्हायला हवा. खादी–ग्रामोद्योग वस्तु विक्री, आंदोलन सारख्या मासिकांचे नियमित वाचन, दलित–आदिवासी समाजात शिकून पुढे येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी चालवण्यात येणाऱ्या जीवन शाळांना मदत असे कार्यक्रम, उपक्रम करत रहायला हवेत, हे भान या निमित्ताने मिळाले!

प्रफुल्ल दुसाने
d.prafulla@rediffmail.com

(टिप्पणी : पान २३ वरून)

होत असेल तर केवळ पर्यावरणाचे प्रदूषण करणारी व्यक्तीच नाही तर अशा कृत्याला अप्रत्यक्षपणे किंवा जाणूनबुजून मदत करणारी कोणतीही व्यक्ती देखील अशा उल्लंघनकर्त्याला बेकायदेशीर आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी जबाबदार असेल.

एनजीटीने जारी केलेल्या निर्देशांत तीन आठवड्यांच्या आत साइटची पाहणी करण्यासाठी आणि पर्यावरणाला झालेल्या नुकसानाचे मूल्यांकन करण्यासाठी तज्ञांच्या समितीची स्थापना करणे या निर्देशांचा समावेश आहे. पर्यावरणीय नुकसान भरपाई, परतफेडीचा खर्च/प्रतिबंधक उपाय आणि प्रकल्प प्रस्तावक/समर्थकांकडून वसूल केला जाणारा दंड यांची गणना समिती करेल आणि परिसर मूळ स्वरुपात पुनर्संचयित करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय देखील सुचवेल. त्यानंतर तीन आठवड्यांत समितीला अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. पश्चिम बंगाल सरकारच्या मुख्य सचिवांनी CRZ-I चे उल्लंघन करण्याव्यतिरिक्त खाजगी विकासकांना झालेल्या आर्थिक फायद्याबाबतही या प्रकरणाची चौकशी करायची आहे आणि सूचीच्या पुढील तारखेपूर्वी त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल करायचे आहे.

दक्षिणबंगा मत्स्यजीवी फोरम (DMF) आणि नॅशनल प्लॅटफॉर्म फॉर स्मॉल स्केल फिश वर्कर्स (NPSSFW) यांना विश्वास आहे की एनजीटीमध्ये दाखल करण्यात आलेल्या ह्या प्रकरणामुळे आणि या संदर्भात जारी करण्यात आलेल्या निर्देशांमुळे सुंदरबन आणि आपल्या देशातील मोठ्या प्रमाणावरील पर्यावरण उल्लंघनाच्या असंख्य प्रकरणांमध्ये उपाययोजना करण्यात आणि न्याय मिळण्यात मदत होईल. ''आम्हाला आशा आहे की हा प्रयत्न सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असलेल्या निंदनीय उल्लंघनांचा सामना करत पर्यावरणीय न्यायासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पुढाकारात आणि उत्साहात भर घालेल'', असे DMFआणि NPSSFWच्या कार्यकर्त्यांनी म्हंटले आहे.

सिरत सातपुते
satputesirat@gmail.com

आघाडीवर

नर्मदा घाटीतील मणिबेली गावच्या आदिवासींचा निर्धार!

हो तेच मणिबेली, ज्या गावात महाराष्ट्रातील नंबर १ चा मतदार राहतो. हे तेच मणिबेली आहे जिथून महाराष्ट्राचा लोकसभा व विधानसभा क्रमांक १ चे खासदार व आमदार निवडून येतात. ग्रामपंचायत देखील १ नंबर आणि सरदार सरोवर धरणात बुडितात जाणारे देखील हे पहिलं गाव. होय हे तेच धरण आहे ज्यात महाराष्ट्राच्यानंदुरबार जिल्ह्यातील धडगाव-अक्कलकुवा तालुक्याची ३३ गावे जी १००टक्के आदिवासी गावे होती ती बुडितात आली. त्या वेळी दावा करण्यात आला होता की हे धरण पूर्ण झाल्यावर महाराष्ट्राला २७ टक्के वीज मिळेल. परंतु चित्र आपल्या समोर आहे, १ युनिटही वीज मिळाली नाही!

मणिबेली गावात बसून धरणावर झगमगाट करणारी रंगीबिरंगी लाईट दिसते.जगातील सर्वात उंच अशा स्टॅच्यू ऑफ युनिटी ची सरदार वल्लभभाई पटेल यांची मूर्ती दिसते.देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होत आली. त्याचा उत्सव साजरा होतो आहे. परंतु गावात आजही धड लाईट नाही की रस्ता नाही.धरण उशाला पण कोरड घशाला. कारण उन्हाळ्यात पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.

इथल्या नर्मदा जीवन शाळेत शिकणारे सर्व विद्यार्थी आदिवासी व याच परिसरातील.गेल्या ३० वर्षांपासून ही शाळा चालते परंतु शासनाची मदत अजूनही मिळालेली नाही.अनेक नेते,मंत्री,वरिष्ठ अधिकारी यांनी भेटी दिल्या व जीवन शाळेचे कौतुक केले, परंतु कोरड्या आश्वासनाशिवाय काहीच दिले नाही. किमान सर्व शाळांना प्रत्येक वर्गात सोलर दिवे तर देऊच शकले असते. थुवाणी जीवन शाळेतील सोलरपम्प गेल्या दोन महिन्यांपासून बंद आहे. संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना सदर परिस्थितीचा विडिओ पाठवला. लेखी पत्र दिले परंतु कार्यवाही शून्य.मणिबेलीची जीवन शाळा सरदार सरोवर मुळे बुडितात आली होती त्यामुळे ती शासनाने नवीन जागेवर बुडीत क्षेत्राच्या बाहेर बांधून मिळावी या मागणीसाठी मुलांनी १४ नोव्हेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन केले, निवेदन दिलेव सांगितले की पावसाळ्यात धरणाचे पाणी अगदी शाळेजवळ येते, त्या पाण्यातून शाळेत मगर,साप, विंचू येऊ शकतो. कुणाच्याही जीवाचे बरे वाईट होऊ शकते, कारण यापूर्वी याच शाळेतील २ विद्यार्थ्यांचा सर्पदंशाने मृत्यू झाला होता.हे सर्व गांभीर्य जिल्हाधिकारी महोदयांना सांगितले परंतु ..... कार्यवाही शून्य!

शेवटी आता गावाने ठरवलंय की श्रमदानातून पुन्हा शाळा बांधकाम करण्याचे. बांबूच्या तट्याची, कौलारू शाळा. आज पर्यंत या वेगवेगळ्या जीवन शाळांमधून ७०००च्या वर मुले-मुली शिकून बाहेर पडली. पहिली पिढी शिक्षित झाली. आताही ७ शाळांमध्ये (प्रत्येक शाळेचा पट १०० च्या वर आहे) विद्यार्थी निवासी राहून शिक्षण घेत आहेत व अशा खडतर परिस्थितीत मानवनिर्मित अंधकारातून उद्याचा प्रकाशाचा मार्ग शोधण्यासाठी मार्गक्रमण करीत आहेत.

अशा वेळी सुरेश भटांच्या ओळी आठवतात,
आम्ही चार किरणांचीही आस का धरावी ?
जे कधीच नव्हते त्याची,वाट का पहावी ?
कसा सूर्य अंधाराच्या वाहतो पखाली,
अरे पुन्हा आयुष्याच्या, पेटवा मशाली......

चेतन साळवे
९३०७५७९९०४

(आघाडीवर: पान २४ वरून)

उभे राहाल आणि जुन्या किंवा नवीन कंत्राटदारांसोबत कामात पुन्हा सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या सर्व संयुक्त कंत्राटी कामगारांना रोजगाराची हमी द्याल. त्यांच्या फायद्यांसह तपशीलवार व्यवस्थेची चर्चा बीएसएनएल बचाव समितीशी, जी शेकडो संयुक्त कंत्राटी कामगार आणि त्यांच्याशी युती असलेल्या इतर लोकांचे निष्पक्ष प्रतिनिधीत्व करते, केली जाऊ शकते. लवकरात लवकर कारवाईच्या अपेक्षेसह धन्यवाद.

- भारतातील चिंतित नागरिक, बीएसएनएल कामगारांच्या संघर्षाचे समर्थक आणि जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (NAPM)

प्रतिनिधी

सुरक्षा रक्षकच आहेत असुरक्षित

जगदीश खैरालिया

रोज बारा तास ड्युटी करून महिन्याला दहा हजार रूपये वेतन मिळते. खोली भाडे चार हजार, सहा हजारात घर चालवायला लागते. दोन मुले, पत्नीआणि वयोवृद्ध आई वडील यांचासाठी वेतन पुरत नाही. त्यामुळे मी कधी कधी डबल ड्युटी करतो. बायकोलाही धुणीभांडी साठी जावं लागतं. अतिशय केविलवाणा होऊन सांगत होता एका बिल्डरच्या साईटवर काम करणारा रखवालदार भोला सकपाळ. तो नुकताच एक खाजगी सुरक्षा एजंसी मार्फत कामाला लागला होता, त्याची ही चौथ्या ठिकाणी नोकरी होती. मालकाची गरज संपली की नोकरी जाते. ना पीएफ फंड, ना ग्रेच्युऐटी, ना बिमा, ना बचत ना नोकरीची हमी! बारा तास ड्युटी करावी लागते. साप्ताहिक सुट्टीदेखील नाही. गणवेशाचे पैसे देखील पगारातून कमी केले जातात. कधी आजारी पडलो तर वेतन कपात होते. कसं जगायचे ? हे उद्‌गार होते एक खाजगी सुरक्षा एजन्सीमार्फत नोकरी करणाऱ्या रखवालदाराचे! अशीच परिस्थिती आहे आज बहुसंख्य रखवालदारांची/सुरक्षा रक्षकांची! लोकांच्या जीवाची, माल-संपत्तीची सुरक्षा राखणारे असंघटित क्षेत्रातील रखवालदार मात्र असुरक्षित आहेत!

जीव, माल संपत्तीच्या सुरक्षाव्यवस्थेसाठी सुरक्षा यंत्रणा ही सरकारी, निमसरकारी आणि खाजगी अशा स्वरुपात राबवली जाते. पोलीस विभागाकडून निवासी सोसायट्यांना देखील रखवालदार नेमण्या बाबतीत सांगितले जाते. अनेक हौसिंग सोसायट्यांमध्ये रखवालदारालाच गेट सांभाळत पाणी मोटर चालवण्यासारख्या इतर कामांचा भार ही दिला जातो. वेतन व सोयी सुविधांबाबत अनेक हौसिंग सोसायट्यांच्या कमिट्या रखवालदार नेमतांना (मोठे हौसिंग काम्पलेक्स वगळून) कोणतेही नियम पाळत नाहीत. बिल्डिंग कंस्ट्रक्शन कंपनी, रूग्णालय व अन्य खाजगी व्यवसायिक, आस्थापना/कार्यालयात देखील सुरक्षा रक्षक असतातच. सुरक्षा यंत्रणा ही एक मोठे व्यवसायिक क्षेत्र बनली आहे.

शासकीय क्षेत्रात कायमस्वरूपी नोकरीत सुरक्षा गार्ड, रखवालदार यांच्या भरतीसाठी शासकीय सेवा शर्ती लागू होतात. आता नवीन आर्थिक धोरण, जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या धोरणांमुळे सुरक्षा सारख्या अति महत्वाच्या आणि संवेदनशील क्षेत्रालादेखील कंत्राटीकरणाने घेरले आहे. सुरक्षा व्यवस्थेचे क्षेत्र फार मोठे आहे. खाजगी व्यक्ती, धनदांडगे आणि सेलिब्रेटीज यांच्याकडे खाजगी सुरक्षा रक्षक/अंगरक्षक नेमण्याचे प्रमाण वाढल्याने सुरक्षाव्यवस्थेत आता खाजगी सुरक्षा एजन्सींचे प्रमाणही वाढले आहे.खाजगी अगंरक्षक/रखवालदारांचे वापर अनेकदा गैरप्रकारच्या कामासाठीही करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे सरकारने सुरक्षा व्यवस्थेला कायदेशीर स्वरूप देण्यासाठी, नियंत्रण राखण्यासाठी आणि जबाबदार यंत्रणा बनवण्यासाठी सर्व प्रकारच्या खाजगी सुरक्षा एजंसीना कायदेशीर प्रक्रियेद्वारे नीति नियमांचे मापदंड लावून कायदे बनविले आहेत व रेग्युलेटरी यंत्रणा ही उभी केली आहे।

The Maharashtra Private Security Guards {Regulations of Employment and Welfare}Act.,1981., The Private Security Agencies (Regulations) Act,2005.and The Private Security Agencies Central Model Rules,2006, The Maharashtra Private Security Agencies (Regulations) Act, 2007 with The Private Security Agencies (Private Security to Cash Transportation Activities) Rules, 2018 आदी कायदे व नियमानुसार सुरक्षा यंत्रणेला सक्षम आणि पारदर्शक करण्याचे धोरण निश्चित केले आहे.

या कायद्यांन्वये महाराष्ट्र शासनाने नियंत्रण ठेवण्यासाठी 'कंट्रोलिंग अथोरिटी' ही नेमली आहे. होम डिपार्टमेंटचे ज्वाईंट सेक्रेटरी किंवा त्यासम पदावरील अधिकारीच हे Controlling

Authority असतात. त्यानंतर विभागीय अधिकारी नेमले जातात. महाराष्ट्र राज्यात 'महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक महामंडळ'च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात ही यंत्रणा राबविण्यात येते. सुरक्षा रक्षकांची भरती पद्धत, सेवा शर्ती, त्यांची शैक्षणिक व शारीरिक पात्रता, वेतन इत्यादीचे नियम लागू करण्यात आले आहेत. त्याबरोबरच किमान वेतन, पीएफ, बिमा, रजा, ग्रॅच्युईटीची योजना राबविली जाते. कामगार विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष या बोर्डाचे पदाधिकारी असल्याने सेक्युरिटी बोर्डाच्या कर्मचाऱ्यांना योग्य वेतन, भत्ते आणि कायदेशीर किमान सोयी सुविधा मिळण्याची हमी आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या अधिनस्त आस्थापनांमध्ये माजी सैनिक, पोलिस विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिले जाते. खाजगी सुरक्षा एजन्सीना कंट्रोलिंग अथोरिटीकडे नोंदणी करून लायसन्स मिळाल्याशिवाय सुरक्षा रक्षक नेमता येत नाही. सुरक्षा एजन्सीना कामाच्या स्वरूपानुसार सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्याची सुध्दा तरतुदी कायद्यात करण्यात आली आहे.

शासकीय व निमशासकीय क्षेत्रातील सुरक्षा रक्षकांना मिळणारे वेतन आज सातव्या वेतन आयोगाच्या धरतीवर पे बॅन्ड, ग्रेडपे आणि महागाई भत्ता धरून वेतन, फंड, ग्रॅच्युईटी, वैद्यकीय बिमा, बोनस, रजा आणि विशेष म्हणजे आठ तासाची ड्युटी इत्यादी सुविधांबरोबरच कामगार कायद्यांचे सुरक्षा कवच देखील त्यांच्या साथीला आहेत.महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ तर्फे भरती प्रक्रिया करून भरती झालेल्या सुरक्षा रक्षकांना देखील वेतन, भत्ते, रजा आणि सोयी सुविधा लागू होतात.

कोणत्याही खाजगी सुरक्षा ऐजंसीला Contract LabourAct, Shop & Establishment Act Factory Act & Industrial Disputes Act., Minimum Wages Act. लागू आहे. मात्र Housing सोसायट्यांना factory act लागू नाही. बाकीची सर्व कायदेशीर बंधने लागू आहेत. मात्र हौसिंग सोसायटीच्या सुरक्षा रक्षकांना सोसायट्या आपल्या उत्पन्नाच्या ऐपतीप्रमाणे विविध प्रकारचे टैक्स, बिले, साफसफाई इत्यादी अन्य खर्च वगळून शेवटी रखवालदारचा विचार करतात. त्यामुळे रखवालदारची शैक्षणिक, शारीरिक योग्यता, प्रशिक्षण वगैरे न पाहता गरजू व कमीत कमी वेतनात सुरक्षेसाठी माणूस नेमला जातो.

एका खाजगी रूग्णालयात रखवालदार म्हणून अनेक वर्षे काम केलेले श्री सावंत सांगतात की, मी रूग्णालयात काम करतांना रूग्णालयातर्फे होतो, तेव्हा मला तेरा हजार रूपये महिना पगार होता. भविष्य निर्वाह निधी योजना लागू केली नव्हती. अचानक तिथे कंत्राटदाराने महिना आठ हजारात माणूस नेमला. मला काढून टाकले. नाईलाजाने आता बिल्डरच्या साईट वर महिना दहा हजार पगारात काम करतोय!

खाजगी सुरक्षा एजंसीवर कायदेशीर निर्बंध आहेत, सरकारने कायदे केले आहेत, कंट्रोलिंग ॲथोरिटी अस्तित्वात आहे, नियम आहेत. परंतु टक्केवारीच्या ओझ्याखाली शासकीय यंत्रणा कुचकामी झाल्याने रखवालदारालाच संरक्षण नसल्याची ही परिस्थिती आज देशाच्या स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी करताना पहायला मिळते आहे.

jagdish.khairalia25@gmail.com

फॉर्म ४ (नियम ८)

आंदोलन शाश्वत विकासासाठी मासिक

नियतकालिकाच्या स्वामित्व व अन्य विषयांसंबंधी विवरण

प्रकाशन स्थान: २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०००१४

प्रकाशन अवधी: मासिक, दर महिन्याच्या १ तारखेस.-

मालक: शाश्वत विकास न्यास

राष्ट्रीयत्व: भारतीय

पत्ता: द्वारा-६, राघव, श्रीरघुराज सोसायटी, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०.

संपादक, मुद्रक व प्रकाशक: मेधा पाटकर

राष्ट्रीयत्व: भारतीय

पत्ता: जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०००१४

मी मेधा पाटकर घोषित करते की, माझ्या जास्तीत जास्त माहितीला व विश्वासाला अनुसरून वर दिलेले विवरण खरे आहे.

मेधा पाटकर

१ मार्च २०२२ प्रकाशक

जगभर

कोविद आणि लोकशाही, युक्रेन-रशिया, म्यानमार

चन्द्रशेखर पुरन्दरे

द इकॉनॉमिस्ट या विश्वासार्ह ब्रिटिश साप्ताहिकानुसार कोविद साथीने जागतिक लोकशाही आणखी दुबळी झाली आहे. त्यांनी पाच प्रमुख कसोट्यांवर १६७ देशांच्या लोकशाहीची तपासणी केली. या कसोट्या अशा -

१. निवडणुकीची प्रक्रिया आणि समाजाच्या सर्व घटकांना समाजकारणात [आर्थिक, राजकीय, शैक्षणिक इ. क्षेत्रांत] सारखा वाव असणे

२. सरकारचे धोरण

३. नागरिकांचा राजकीय सहभाग

४. लोकशाही दृढ होईल अशी राजकीय संस्कृती

५. नागरी स्वातंत्र्य

या मुद्यांवर पाहणी करता जगातील एक-तृतीयांश लोकसंख्या हुकूमशाहीखाली आहे. बाकीच्यांतील बहुतांश लोक वस्तुत:- हुकूमशाही-पण-सांगायला-लोकशाही, सदोष लोकशाही [भारत] अशा व्यवस्थांमध्ये आहेत. फक्त ६.४ टक्के लोक संपूर्ण लोकशाहीत रहातात.

सतत दुसऱ्या वर्षी कोविदमुळे लोकशाहीवर ताण आलेला आहे. लॉकडाऊन , प्रवासावरील निर्बंध यायोगे सगळ्याच देशांत नागरी स्वातंत्र्यावर बंधने आली, नोकऱ्या गेल्या. सरकारचा हस्तक्षेप बहुतेक लोकांनी आधी मान्य केला तरी २०२१ च्या सुरुवातीपासून त्याविरुद्ध लोकशाही देशांत आवाज उठत आहेत. ते आता वाढतच आहेत.

लॉकडाऊन, सक्तीचे लसीकरण अशा उपायांना पाठिंबा देणारे एका बाजूला आणि कोणत्याही परिस्थितीत नागरी स्वातंत्र्याचा संकोच अमान्य असणारे दुसऱ्या बाजूला - यांच्यांतील दरी रुंद होत आहे. हे ध्रुवीकरण सम्यक समाजाला हितकारक नाही.

कॅनडामध्ये ट्रक ड्रायव्हर्सनी रास्ता रोको करून अमेरिका-कॅनडा सीमेवरील एक महत्त्वाचा पूल बंद पाडला, या ट्रक ड्रायव्हर्सनी त्यांच्या निषेधाला freedom convoy असे संबोधले. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन असेच convoy युरोपच्या इतर देशात निघत आहेत. जर्मनी, बेल्जियम, ऑस्ट्रिया, फ्रांस, वगैरे. तसेच ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडमध्येही. हे सगळे लोकशाही देश. हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न मानून सरकारे पोलिसी नियंत्रणाचा प्रयत्न करतात. त्यामुळे या लोकांच्या मूळ मागणीला उत्तर मिळत नाही. प्रश्न लसीकरण सक्तीचे असावे का नसावे, प्रवासावर निर्बंध असावेत का नसावेत हा नाही. प्रश्न ही धोरणे मान्य नसणाऱ्यांना लोकशाहीत मतप्रदर्शनाची संधी मिळते का नाही हा आहे. त्या मोजमापावर लोकशाही दुर्बल झालेली दिसते.

खोलात जाता, दुसऱ्या एका मतानुसार, मुळात लोकशाही-वरचा उडत असलेला विश्वास, राष्ट्र-राज्य या संस्थेबाबत संदेह ही अदृश्य पण प्रमुख कारणे दिसतात. या मतात तथ्य आहे. कोविद-निर्बंध हे तात्कालिक कारण , पण हा खदखदत असणारा असंतोष त्या निमित्ताने व्यक्त होत आहे. उदा. फ्रान्समधील असंतोष मुख्यत: मॅक्रोन या राष्ट्राध्यक्षांच्या विरुद्ध आहे. त्याची धोरणे ज्यांना पसंत नाहीत, ते अति-उजवे, अति-डावे आणि मधले अनेक असे या निमित्ताने एकत्र आले आहेत. तोच प्रकार हॉलंडमध्ये. तेथे राजकारण्यांवरचा विश्वास रसातळाला गेला आहे. त्यात या निर्बंधांची भर. या असंतोषाचा फायदा अति-उजव्या शक्ती घेत आहेत. त्या इतर गटांपेक्षा म्हणजे अराजकवादी, डावे यांच्यापेक्षा अधिक संघटित आहेत.

या संदर्भात विशेषत: कॅनडाचे उदाहरण पहाण्यासारखे आहे. तो देश विकसित आहे आणि लोकशाही आहे. तेथील फक्त साडेदहा टक्के लोकांना आपल्याला निवडीचे स्वातंत्र्य आहे असे वाटते. [स्वातंत्र्य फक्त सरकार निवडण्याचे नाही तर जीवनाच्या प्रत्येक आयामात निवडीचे स्वातंत्र्य] अधिक चिंताजनक म्हणजे, १३ टक्के लोक लोकशाहीपेक्षा लष्करशाही अधिक श्रेयस्कर मानतात. आपल्याकडे असे सर्वेक्षण झालेच तर जनमानसाचा कल कळू शकेल. पण सुधारलेल्या लोकशाही

देशातील जनतेचा लोकशाहीबाबत किती भ्रमनिरास झाला आहे, हा आपल्या 'लोकशाही'च्या भविष्याविषयी एक संकेत आहे.

याचे एक कारण म्हणजे तो पंतप्रधान अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घालत आहे. उदा. लॉकडाऊनमुळे अनेक तरुणांच्या नोकऱ्या गेल्या. वृद्ध पालकांना सांभाळणे अशक्य झाले. त्यांनी संतापाने या निर्बंधांवर वक्तव्य केले तर सरकार त्यांचे म्हणणे ऐकण्याऐवजी ते विधान आक्षेपार्ह ठरवते. जोपर्यंत कोणाचे वक्तव्य हिंसेला प्रोत्साहन देत नसेल, तोपर्यंत भाषणस्वातंत्र्य किंवा अभिव्यक्तीस्वातंत्र्य लोकशाहीत गुन्हा असू नये. सरकारविरोधी विधाने हा सार्वजनिक जीवनाचा भाग आहे हे सत्ताधीशांनी लोकशाहीत सतत ध्यानात ठेवले पाहिजे. तो तोल आपल्याकडे जसा सुटला आहे, तसाच ट्रकड्रायव्हर्सच्या, इतरांच्या निषेधाने कॅनडाच्या पंतप्रधानांचा.

अर्थात हे लक्षात ठेवले पाहिजे की एकूण जगाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निषेध करू शकणारे अल्पसंख्य आहेत. बहुसंख्यांकांना विशेषत: हुकूमशाहीखालच्या ३ ३ टक्केंना असे निषेध करणे शक्यच नसते. त्यात चीनसारख्या देशात विरोधकांची मुस्कटदाबी करण्यासाठी 'कोविद पास' चा गैरवापर करण्याच्या घटना घडल्या आहेत.

परत लोकशाहीचे जागतिक चित्र पहाता स्वीडन, नॉर्वे, फिनलँड इ. स्कँडिनेव्हियन देश संपूर्ण लोकशाही आहेत, तर दुसऱ्या टोकाला तालिबानच्या विजयानंतरचा अफगाणिस्तान, लष्करी उठावानंतरचा म्यानमार आणि लोकशाही मानांकाच्या कायमच शेवटी असणारा उत्तर कोरिया हे देश आहेत.

दक्षिण अमेरिका खंडाचे चित्र पाहण्यासारखे आहे कारण आपल्याकडेही तेच दिसते. तेथे तुष्टीकरणाच्या लोकानुयायी घोषणा, आश्वासने देणारे नेतृत्व उदयाला आले आहे. हे नेतृत्व तथाकथित निर्वाचित लोकशाहीच्या मार्गाने आले असले तरी वस्तुत: ते लोकशाही दुबळी करते हे लेखाच्या सुरुवातीला दिलेल्या कसोट्यांवरून स्पष्ट व्हावे.

रशिया-युक्रेन

मागच्या अंकात या संभाव्य संघर्षाचा सविस्तर आढावा घेतला होता. तेव्हापासून हा लेख लिहिण्याच्या वेळेपर्यंत परिस्थितीत मूलत: फरक पडलेला नाही. युरोपिअन राष्ट्रप्रमुखांच्या रशिया-अमेरिका व इतर देशांच्या वाऱ्या मात्र अतोनात वाढल्या.

पश्चिम - त्यातही अमेरिका, ब्रिटन यांनी येत्या काही दिवसांत नाही तर आठवड्यांत रशिया युक्रेनवर आक्रमण करेल असा रोजचा गजर गेला महिनाभर लावला आहे. त्यांच्या या दाव्याची कर्णकर्कशता जशी वाढत आहे, तसेच रशियाचे अधिकृत प्रतिपादन-आक्रमण करण्याचा इरादा नाही. आता तर रशियन माध्यमातून पश्चिमेची चेष्टा होत आहे - 'केव्हा आक्रमण होणार त्या तारखा पश्चिमेने जाहीर केल्या तर बरे होईल, मला माझ्या सुट्ट्या, रजा त्याप्रमाणे आखता येतील!'

दरम्यान युक्रेन सीमेवरील रशियन सैन्य दीड लाखाहून जवळ जवळ दोन लाखापर्यंत गेल्याचे पश्चिमेचे म्हणणे आहे. वातावरण आणखीच तापेल हे कळत असतानाही किंवा ते आणखी तापावे म्हणून रशियाने क्षेपणास्त्रांची चाचणीही याच काळात केली. प्रत्युत्तर म्हणून NATO नेही [North Atlantic Treaty Organisation - अमेरिका, कॅनडा व युरोपातील देशांची संघटना] आपले सैन्य शेजारच्या देशांत वाढवले आहे. आधीच्या लेखात म्हटल्याप्रमाणे, युक्रेनला शस्त्रास्त्रांचा व इतर मदतीचा ओघ NATO कडून चालू आहेच.

NATOचा सभासद जर्मनीची या रस्सीखेचीत पंचाईत झाली आहे. जर्मनीला प्रचंड गॅस पुरवठा करणारी रशिया ते जर्मनी ही पाईपलाईन नियोजित आहे. [Nord Stream]

काही शासकीय मान्यता झाल्यावर हा गॅस पुरवठा सुरु होऊ शकतो. पण रशियाने युक्रेनवर आक्रमण केलेच तर जर्मनी त्यातून गॅस घेणार नाही अशी हमी जर्मनीने मागच्या वर्षी अमेरिकेला दिली आहे.

या हमीच्या जोरावर आक्रमण झालेच तर ही पाईपलाईन बंद करू असा इशारा अमेरिकन अध्यक्ष बायडेन यांनी दिला आहे. वस्तुत: हा जर्मनी व रशिया या दोन सार्वभौम देशातील व्यापार आहे. त्यात अमेरिकेचा संबंध नाही. पण अमेरिका NATOचा सभासद या सबबीवर ही दादागिरी करत आहे.

या फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात युक्रेनच्या डोनेट्स्क व लुहान्स्क या प्रदेशांवर युक्रेनने हल्ले चालू केले आहेत असा रशियाचा दावा आहे. हे प्रांत रशियाला लागून व रशियाला

(पान ३६ वर)

ठिकठिकाणच्या लढाया जोडत व्यापक चळवळ

सुनीती सुलभा रघुनाथ

१९७० च्या काळातच सध्याच्या विकास पद्धतीविषयी इतर लढ्यांबरोबर, नर्मदा, टिहरी, कोएल-कारो, सुवर्णरेखा, आलियापाल, चिलिका, भोपाळ विषारी वायू दुर्घटना, छत्तीसगढ मुक्ती मोर्चा, किनारपट्टीवरील मच्छिमार, गिरणगांव संघर्ष समिती, शोषित जन आंदोलन, अनेक किसान-मजूर संघटना, भूमिहीनांच्या व असंघटित कामगारांच्या लहान-मोठ्या चळवळी अशासारख्या देशभरातील जन-आंदोलनांनी आजवरच्या विस्थापनावर, विकास प्रकल्पांवर, धोरणांवर तसेच त्यामागील विकासाच्या धारणेच्या प्रत्येक अंगाबाबत सवाल केले व पर्यायी विकासाच्या राजकारणाचा विचार मांडला. नर्मदेच्या लढ्यात विस्थापनाच्या प्रश्नांवरून सुरुवात होऊन विस्थापनाला व विकास प्रकल्पाच्या सार्वजनिक वा राष्ट्रीय हिताच्या दाव्यांनाच साधार व जनसंघर्षाद्वारे आव्हान दिले गेले. अशा अनेक लढ्यांमध्ये समता, समान वाटप, लोकशाही हक्क, प्रक्रिया, विस्थापन-विनाशाला विरोध व पर्यावरणीय शाश्वतता ही मूळ सूत्रे आहेत. विकासाच्या रुढ धोरणाच्या व प्रारूपाच्या चौकटीतच काही सुधारणा अशा स्वरूपाची त्यांची मांडणी नाही. केंद्रीकृत व पर्यावरणविरोधी विकासपद्धती व त्याचे तंत्र व संघटनपद्धती कायम ठेवून, त्याचे परिणाम मात्र वेगळे मुक्तीदायी यावेत ही अपेक्षा करता येत नाही. त्याऐवजी आजच्या उत्पादन-उपभोग पद्धतीलाच मुळातून सवाल करण्याची गरज आहे, ही बाब या संघटना व तज्ज्ञांनी आजवरच्या स्वत:च्या व व्यापक अनुभव व अभ्यासाद्वारे निडरपणे मांडली. विकासाच्या अंधश्रद्धेला विरोध करून, तर्कशुद्ध व व्यवहार्य पर्यायांची मांडणी ते करत आहेत. नव-वर्चस्ववाद्यांबरोबरच ते पुरोगामी परंपरेतील काही धारणा, राजकारणालाही तोंड देत आहेत. या विविध जन-आंदोलनांनी केलेले आजच्या स्थितीचे विश्लेषण व पर्यायी विकासाची मांडणी, त्यांनी केलेली संघर्ष व रचनेची आंदोलने व राजकारण ही यापुढील परिवर्तनाच्या राजकारणाचा मार्ग असेल.

नैसर्गिक साधनसंपदेवर सामुदायिक अधिकार हा समतेच्या तत्वाचा विस्तार होय. लोक अधिकार व साधनसंपदेचे (जसे जमीन, पाणी, जंगल, रोजगार इ.) उत्पादित वस्तूंचे समतापूर्ण व न्याय्य वाटप हा समाजवादी विचारांचा गाभा राहिला आहे. भारतातील अनेक संघटना व संस्थांनी पाण्याचे विकेंद्रित व्यवस्थापन व समतापूर्ण वाटप ही संकल्पना रुजविण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. विकासाच्या नावावर उध्वस्त होऊ घातलेले व झालेले विस्थापित धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, मच्छिमार, खाणी-अभयारण्य-कारखाने-महामार्ग, पर्यटन यामुळे आपल्या साधनसंपत्तीवरून देशोधडीला लागलेले समूह, नव्या आर्थिक धोरणामुळे रोजगारावरून फेकले गेलेले संघटित व असंघटित कामगार, छोटे व्यावसायिक, लहान उद्योजक या सर्वांनाच याचा फटका बसला आहे. समता व शोषणमुक्तीच्या सिद्धांतन व राजकारणात या सर्वांना सामावून घ्यावे लागणार आहे. केवळ शोषितांच्याही पलीकडे जाऊन समग्र समाजाच्या संवेदनेचा हा विषय व्हावा लागेल तरच त्याला बळ मिळेल. गांधीजींच्या विचारांमध्ये या समग्रतेची जाणीव आहे.

समतेच्या या वाटचालीत नव्या संदर्भातील विकेंद्रीकरण व ग्रामस्वराज्य या संकल्पनांचे महत्व पुढे येत आहे. अर्थपूर्ण लोकशाहीचा पाया घालू पाहणारे हे विकेंद्रीकरण जुन्या खेड्याकडे चला असे सांगणारे नाही, हे बुजुर्ग सर्वोदयी देखील आवर्जून सांगतात. नव्या विकेंद्रीकरणात समानतेला व समान अधिकारांना महत्त्वाचे स्थान असेल. मुद्दा विकेंद्रीकरण समर्थकांची उलटतपासणी घेण्याचा नसून, समुहांच्या व व्यक्तीच्या अर्थपूर्ण अधिकार व सृजनशीलतेसाठी, लोकशाही निर्णयप्रक्रियेसाठी आपल्याला आता केंद्रीकृत संरचनेपासून दूर जायचे की नाही, हा आहे. ग्राम स्वराज्य किंवा 'हमारे गांव में हमारा राज' अशा संकल्पनांमागील हेतू हा निर्णय प्रक्रिया व सत्ता संरचनेतील विकेंद्रीकरणाचा असतो. त्याचा आशय व प्रक्रिया ही स्थलकालानुसार अधिक परिष्कृत करावी लागेल.

आपल्या जीवनाशी निगडित, आपल्या परिसरातील निर्णयांमध्ये आपल्याला, परिसरांतील जास्तीत जास्त जणांना वाटा व वाव देणारी पद्धती म्हणजे विकेंद्रीकरण असून, लोकशाही, समतेची व वर्चस्वविरोधाची ती पूर्वशर्त ठरते. शोषित समूहांच्या सक्षमीकरणासाठी हे आवश्यक आहे. ते परिणामकारक

ठरण्यासाठी माहितीचा अधिकार व लोकांचा संमती देण्या न देण्याचा (सहमतीचा) अधिकार महत्वाचा ठरत आहे. देशातील अनेक आदिवासी, शेतकरी व अन्य कष्टकऱ्यांच्या संघटनांची तशी मागणी राहत आली आहे.

मात्र सर्वात कठोर आणि जीवघेणा संघर्ष आहे तो शहरी गरीबांचा. धरणग्रस्तांच्या, प्रकल्पग्रस्तांच्या लढाया विस्थापनाच्या विरोधातल्या असतात आणि त्या बहुतेकदा त्यांच्या जमिनीवरच ते लढत असतात. इथे तर मुळात ही माणसेच कुठूनकुठून विस्थापित होऊन आलेली, जगण्यासाठी! कधी कुठल्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेली तर बहुतेकदा दुष्काळ, बेरोजगारी यामुळे रोजगाराच्या शोधासाठी शहराच्या वळचणीला आलेली. खरेतर यांच्या स्वस्त श्रमांवरच ही मोठमोठी शहरे चालतात. मात्र शहरांना ही माणसे नको असतात, फक्त त्यांच्या सेवा हव्या असतात, ती जिथून आली तिथले पाणी, तिथे निर्माण होणारी वीज, अन्नधान्य, फर्निचरसाठी लाकूड, बांधकामासाठी दगड-माती-स्टील हे सगळे त्यांना हवे असते. ते सर्व शहरांनी ओरबाडून नेल्यामुळेच तर त्यांची गावे, त्यांचा परिसर ओसाड, बकाल झालेला असतो आणि त्यांनी निरुपायाने सोडलेला असतो. पण ही माणसे शहरात जिथे आपले निवारे करतात त्यांना 'अनधिकृत' ठरवले जाते. गलिच्छ वस्ती मानले जाते. ही माणसेही मग शहरांत अनधिकृत ठरतात. त्यांचे निवारे, त्यांनी रक्ताचे पाणी करून जमवलेली काडी-काडी बुलडोझरने चिरडली जाते. त्यांना उचलून फेकले जाते, पुन्हा-पुन्हा. त्यांच्या शहरातल्या वास्तव्यासाठी 'कट-ऑफ डेट' ठरवली जाते. तुम्ही शहरावरची सूज आहात असे त्यांना विविध प्रकारे सतत ऐकवले जाते. अशाही परिस्थितीत ही माणसं बुलडोझरला सामोरी जात, थोपवत राहतात, आपले हक्क मागत राहतात, या सर्व विपरीत स्थितीतही जीवनाला रसरशीतपणे सामोरे जात राहतात, परस्परांना मदतीचा हात देत राहतात, लढत राहतात.

नर्मदा असो की लवासा, इंडस्ट्रियल कॉरिडॉर असो की मुंबईतली गरीब वस्ती; प्रत्येकच ठिकाणी आंदोलन उभे राहते ते प्राय: स्थानिक लोकांवरील अन्यायाच्या मुद्यावर. लोक एकत्रित येतात ते स्वत:वरील अन्यायाच्या विरोधात. खरेतर अनेकदा मुद्दे असे असतात की त्यासाठी आंदोलन करण्याची गरजच असू नये. तरीपण सत्ता आणि संपत्तीधाऱ्यांचे हितसंबंध, शासकीय-प्रशासकीय निर्ममता आणि भ्रष्टाचार, कायद्याची प्रच्छन्न पायमल्ली आणि गरीब बिचाऱ्या जनतेप्रती कमालीचा तुच्छताभाव यामुळे प्रकल्प अक्षरश: लादले जातात. ज्यांच्या जिवावर आणि ज्यांच्या नावाने ते आखले जातात त्या लोकांना कुठल्याही पातळीवर विश्वासातच न घेता. एकेकाळी तर अशा प्रकल्पांबाबत 'विकास' प्रकल्प अशी किमान अपेक्षा तरी असायची, आता तर लवासासारख्या खासगी रिअल इस्टेटसाठी नदीचे खोरेच आंदण दिले जाते. सेझ, कॉरिडॉर किंवा समृद्धी महामार्गासारख्या प्रकल्पांसाठी सर्व कायदेच 'कायदेशीररीत्या' गुंडाळून ठेवले जातात. अशा वेळी त्यांच्या विरोधाच्या कक्षाही बदलतात. म्हणजे असे की जिथे प्रकल्पासाठी विस्थापन अपरिहार्य असेल तर, (अगदी न्यायपूर्ण अशक्यच असले तरी) किमान आहे त्या कायद्यानुसार पुनर्वसनासाठीही विस्थापितांना पिढ्यान् पिढ्या लढावे लागते. दुसरीकडे, सर्व कायदे गुंडाळून ठेवत लवासासारखी कंपनी येते आणि स्थानिक जनतेला सार्वजनिक हेतूसाठी जनतेला नदीखोऱ्यातून उठवून निर्माण केलेल्या जलाशयावर, त्या जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रावर, तिथल्या नाजुक पर्यावरणावर, तिथल्या गावसमाजांच्या अस्तित्वावरच आक्रमण करते तेंव्हा तो मुद्दा केवळ पुनर्वसनाचा किंवा नुकसानभरपाईचा उरत नाही तर कायद्यांच्या पालनाचा, जमीन-पाण्यासारख्या नैसर्गिक संसाधनांच्या अधिकाराचा आणि त्यांच्या वापराच्या प्राधान्यक्रमाचा, स्थानिक गावसमाजांच्या नागरी हक्कांच्या अंमलबजावणीचा असा अनेकपदरी बनतो. तिसरीकडे, सेझसारखे कायदे बनवून अशा 'रिअल इस्टेट' प्रकल्पांनाच अधिमान्यता देण्यात येते, इतकेच नव्हे तर त्यासाठी आजवर लढून मिळवलेले कामगार कायदे गैरलागू करणे, विविध करसवलती किंवा टॅक्स हॉलिडे (म्हणजे कर 'सुट्टी'च) देणे इथपासून तर शेतीखालची जमीन बिगरशेतीकडे – आणि ती देखील बहुतेकदा अनुत्पादक उद्योगांकडे वळवणे या सर्व बाजूंनी पाहिले की त्या प्रक्रियेलाच आव्हान देणे भाग पडते. त्यासाठी मग आपली जमीन वाचवू मागणाऱ्या शेतकरी-मच्छिमार व अन्य कष्टकऱ्यांची जमीन वाचवण्याची लढाई, त्यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार बजावत, ग्रामसभांच्या ठरावांपासून तर प्रसंगी सार्वमतही घेऊन पुढे न्यावी लागते आणि त्याचवेळी सेझसारख्या अन्याय्य कायद्याला विरोधही संघटित करावा लागतो; ठिकठिकाणच्या लढाया जोडत जावे लागते आणि एक व्यापक चळवळच उभी करून, एकमेकांच्या लढ्यांना बळ देत, सनदशीर मार्गानेच पण सरकारपुढेच आव्हान उभे

करणे भाग पडते – नव्हे, तसे झाले तरच ते उभे राहते. चवथीकडे, मुंबईसारख्या शहरात, जिथे ६० टक्के लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहतात आणि त्यांपैकी बहुतेकांना 'अनधिकृत' ठरवत त्यांच्या झोपड्यांवर-निवाऱ्यांवर बुलडोझर फिरवला जातो त्यावेळी, एका बाजूला ते बुलडोझर थोपवत दुसऱ्या बाजूला गरीब-कष्टकऱ्यांच्या निवाऱ्याच्या हक्कांची, ज्यांच्या स्वस्त श्रमांवर मुंबई चालते त्यांना स्वस्त निवारा मिळण्याच्या मागणीची, या देशातल्या प्रत्येक नागरिकाला देशात कुठेही जाऊन रोजगार करण्याचा हक्क संविधानानेच दिलेला आहे, तेव्हा कुणालाही इथे येण्यापासून, इथे जगण्यापासून मज्जाव करता येणार नाही हे ठणकावून सांगण्याची लढाई त्याच्या बरोबरीने लढावी लागते. एका बाजूला, ''गरीबों का श्रम कितना, हक कितना – हिसाब करो, हिसाब दो।'' हा सवाल व्यवस्थेपुढे उभा करावा लागतो, त्याचबरोबर, ग्रामीण भारतातली जंगले, शेती, जलस्त्रोत गिळंकृत करत उभी राहणारी शहरे आणि गावातील रोजगार संपल्याने जगण्यासाठी नाइलाजाने शहरांत येणाऱ्या ग्रामीण कष्टकऱ्याला मात्र 'अनधिकृत' ठरवणाऱ्या शहरकेंद्री विकासनीतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करावे लागते. नर्मदेच्या आंदोलनाने २६-२७ वर्षांपूर्वी केलेला 'कुणाचा विकास – कुणाचा बळी देऊन ?' हा सवाल पुन्हापुन्हा व्यवस्थेपुढे उभा करावा लागतो.

हे सारे ज्यांच्यासाठी, ज्यांच्यासह, किंबहुना ज्यांच्या द्वारे करायचे, त्या जनसमुहांना या सर्व व्यामिश्रतेची जाण आणि जाणीव असतेच असे नाही. मुळात ते एकत्र आलेले असतात, लढत असतात ते स्वत:वरचा हल्ला थोपवण्यासाठी. बहुतेकदा त्यांनी ना सरकारकडे काही मागितलेले असते, ना त्यांचे काही गाऱ्हाणे असते. त्यांच्या साध्या, कष्टाच्याच परंतु बहुतांश स्वावलंबी जगण्यावर सरकारनेच आघात केलेला असतो, म्हणून ते लढायला उभे राहिलेले असतात. जे लढूच शकत नाहीत आणि 'आपले भोग' म्हणत, परिस्थितीचा स्वीकार करत निमूटपणे देशोधडीला लागतात त्यांची तर गणतीच नाही. जे विरोध करतात त्यांचा विरोध मोडून काढण्यासाठीही व्यवस्थेकडे बरीच हत्यारे असतात. सरकारी धोरणांमुळेच शेती ही मुळातच आतबट्ट्याची झाल्यानंतर, ''काय ठेवलं आहे शेतीत –'' म्हणत, स्वप्नातही कधी न पाहिलेली रक्कम देऊ करून भूमिपुत्रांना उठवणे कंपन्यांना अगदीच सोपे असते. काही लाख रुपये घेऊन शेतीवरून, गावांमधून बाहेर पडलेले हे लोक, कुठल्याही अन्य कौशल्याअभावी, व्यावसायिक अनुभवाअभावी, रोजगाराअभावी वर्ष-दोन वर्षांतच शहरांमधल्या झोपडपट्टीत अत्यंत बकाल जिणे जगायला लागतात... मात्र हे जाणवून जे विस्थापनाला विरोध करतात, तेच आपले विस्थापन थोपवत असतानाच एका बाजूने त्या बलाढ्य ताकदीला नमवतात, आणि त्याच बरोबर या विस्थापनाशी संबंधित अनेक मुद्दे पुढे नेत एका अर्थाने विकासविषयक चर्चा समाजात उपस्थित करतात. (क्रमश:)

napm.suniti@gmail.com

आजादी ७५ अभियानात सामील व्हा !

देशाच्या स्वातंत्र्याचे हे अमृतमहोत्सवी वर्ष. या निमित्ताने देशभर अनेक संस्था संघटना अनेकविध पद्धतीने हे वर्ष साजरे करीत आहेत. जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाने या निमित्ताने सुरु केलेल्या **आजादी की राह पर – समजून घेऊ तरुणाईला** हे अभिनव अभियान सुरु केले आहे. या अंकात या संदर्भात संपादकीय, खास वृत्त या सदरात सविस्तर माहीती दिलेली आहे. अधिक माहीतीसाठी संपर्कही दिलेले आहेत. या अभियानाबद्दलचा, या अंतर्गत आयोजित विविध स्पर्धांबाबतचा निरोप, आपण अधिकाधिक विद्यार्थी, युवा, महिला यांच्या पर्यंत पोहोचवणार का ? अगदी घर बसल्या आपल्या व्हॉट्स अप वरून, साधा फोन करून आपण याची माहीती आपल्या परिचितांपर्यंत पोहोचवा ! स्पर्धेची माहीती देणाऱ्या पानांच्या प्रती काढून वितरीत करा !! या देशप्रेमाच्या आणि परीवर्तनाच्या कार्यात सामील व्हा !!!



नव्या युगातील
करिअर्सचे एकमेव प्रवेशद्वार!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
१.४० कोटी उत्तीर्ण विद्यार्थी
Introduction to Computer & Smartphone
Computer & Voice Typing
Windows 10
Internet / Chrome
MS Word
MS Excel
MS PowerPoint
Outlook/Gmail
Office 365
G Suite
Mobile Apps
Coding



उद्याच्या जगात वावरण्याचा आत्मविश्वास!
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
KLiC Tracks
klic.mkcl.org
MKCL KLiC Diploma
Gateway to Knowledge Lit Careers
Job Readiness
Accounting
Digital Arts
Designing
Programming
Management
Hardware & Networking
New Collar Jobs

Marathi-Monthly - Andolan Shashwat Vikasasathi, Editor-Medha Patkar. Postal Regn. No. MCE/296/2021-23
RNI No. MAHMAR/2009/30128 Licence to Post without Prepayment No. MR/Tech WPP/East/358/2021-23
Date of Publication 1st of every month Date of Posting 1st of every month Posted at Dadar P.O. 400014.

(जगभर : पान ३१ वरून)

अनुकूल आहेत. हे हल्ले व युद्धाची भीती यामुळे तेथून २० हजार लोक तातडीने तिसऱ्या आठवड्यातच रशियाला गेले. या प्रांतांत युक्रेनचे सरकार व स्थानिक सरकार यांच्या चकमकी सुरु झाल्या आहेत व बळी पडत आहेत. त्यामागे युक्रेनने केलेले हल्ले का रशियाने दाखवण्यासाठी केलेले हल्ले हे सांगणे कठीण आहे. पण सुमारे सात लाख लोक विस्थापित होण्याची शक्यता आहे. विस्थापन त्या त्या स्थानिक सरकारांनी सुरु केले आहे हे विशेष. त्यात अनाथाश्रमातील लहान मुले, वृद्ध यांचाही समावेश आहे. त्या जनतेचे संरक्षण हे कारण दाखवून रशिया युक्रेनवर आक्रमण करणार असा पश्चिमेचा दावा आहे.

युद्ध झालेच तर ते १९४५ नंतरचे युरोपमधील पहिलेच मोठे युद्ध होईल. या युद्धज्वरातील अतोनात खर्च, विध्वंस, पर्यावरणाची व मानवी जीवनाची हानी विषण्ण करणारी आहे. निष्पन्न काय तर भूराजकीय नकाशा थोडाफार बदलेल.

या संदर्भात जाताजाता नमूद करण्यासारखे एक निरीक्षण म्हणजे - CNN, BBC हे टीव्ही चॅनेल्स उघड उघड अमेरिकेची भूमिका घेतात तर रशियन टीव्ही रशियाच्या बाजूने बोलतो. तुर्कस्तानी टीव्ही, अल-जझीरा हा मध्यपूर्वेतील चॅनेल आणि युरो-न्यूज हा युरोपिअन चॅनेल त्यातल्या त्यात निष्पक्ष बातम्या देतात. माध्यमांची 'सोईस्कर सत्यता' तुम्ही कोणता चॅनेल बघता, त्यावर तुमचे मत ठरवते.

म्यानमार

म्यानमारमधील लष्करी उठावाला एक वर्ष झाले. आँग सू यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर येऊ घातलेले नागरी निर्वाचित सरकार लष्कराने उलथून टाकले. रस्त्यावरचे विरोध हिंसेने दडपले व आँग सू यांच्यामागे बनावट खटल्यांचा ससेमिरा लावला. हे सत्र चालूच आहे. आजवरच्या खटल्यांतील शिक्षेवर त्या तहहयात अटकेत रहातील. फेब्रुवारीच्या सुरुवातीला आणखी काही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत आणि नवीन आरोप अपेक्षित आहेत. या खटल्यांची सुनावणी खाजगीत होते. आरोपीला किंवा त्यांच्या वकिलांना माध्यमांशी बोलता येत नाही.

दरम्यान लष्कराला विरोध करणाऱ्यांना देशात जगणे अशक्य करण्यात येत आहे. लष्करविरोधकांना आश्रय देतात या संशयावरून वायव्य म्यानमारमध्ये नुकत्याच दोन खेड्यांना आगी लावण्यात आल्या. त्यात दोनशे तरी माणसे मृत्यू पावली व अनेक बेघर झाले. म्यानमारच्या यातनाकांडाला अंत दिसत नाही.

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन-शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.

प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.

To,